RNI No. - MAHMAR 2023/84526

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com

❑ वर्ष - १ ❑ अंक -२६९ ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शनिवार दि.३० डिसेंबर २०२३ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते १५ हजार ७०० कोटींहून अधिक किमतीच्या अनेक विकास प्रकल्पांचे उद्धाटन आणि पायाभरणी

**दि.३०विदर्भ प्रजासत्ताक अयोध्या**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज शनिवारी उत्तर प्रदेशातील अयोध्येतील रेल्वे स्टेशन आणि विमानतळाचे उद्धाटन केलं. तसंच, १५ हजार ७०० कोटींहून अधिक किमतीच्या अनेक विकास प्रकल्पांचे उद्धाटन आणि पायाभरणी केली. यादरम्यान त्यांनी एका कार्यक्रमाला संबोधितही केले. आमच्या सभ्यतेने आम्हाला मार्ग दाखवला, असं पंतप्रधान म्हणाले. एक काळ असा होता की रामलल्ला तंबूत होते, आता फक्त रामलल्लाच नाही तर देशातील चार कोटी गरीब जनतेलाही कायमस्वरुपी घर



मिळाले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, आज देशात केवळ केदारधामचे पुनरुज्जीवन झाले नाहीतर ३१५ हू अधिक नवीन वैद्यकीय महाविद्यालयेही बांधली गेली आहेत. आज देशात केवळ महाकाल महालोकाचीच निर्मिती झाली नाही, तर प्रत्येक घरात पाणीपुरवठा करण्यासाठी २ लाखांहून अधिक पाण्याच्या टाक्याही बांधल्या. अयोध्येच्या विमानतळाचा उल्लेख करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, अयोध्या धाम विमानतळाचे नामकरण त्रिकालदर्शी महर्षी वाल्मिकी यांच्या नावाने केल्याने या विमानतळावर येणाऱ्या प्रत्येक प्रवाशाला आशीर्वाद मिळेल. महर्षी वाल्मिकी यांनी लिहिलेले रामायण हे ज्ञानाचा मार्ग आहे, जो आपल्याला भगवान श्री रामाशी जोडतो. आधुनिक भारतात, महर्षि वाल्मिकी आंतरराष्ट्रीय विमानतळ, अयोध्या धाम, आपल्याला दिव्य-भव्य-



नवीन राम मंदिराशी जोडेल.आज संपूर्ण जग २२ जानेवारीच्या ऐतिहासिक क्षणाची आतुरतेने वाट पाहत आहे. अशा स्थितीत अयोध्येतील जनतेमध्ये कमालीचा उत्साह आहे. मी भारताच्या प्रत्येकाचा पूजक आहे. मीही तुमच्यासारखाच उत्सूक आहे. आम्हा सर्वांच हा जल्लोष आणि उत्साह अयोध्येच्या रस्त्यावर पूर्णपणे दिसत होता. जणू संपूर्ण अयोध्या नगरी रस्त्यावर आली आहे. या प्रेम आणि आशीर्वादाबद्दल मी मनापासून कृतज्ञता व्यक्त करतो, असंही पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.

देशाच्या इतिहासात ३० डिसेंबर ही तारीख खूप ऐतिहासिक आहे. या दिवशी १९४३ मध्ये नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी अंदमानमध्ये ध्वजारोहण करून भारताच्या स्वातंत्र्याची घोषणा केली. आज स्वातंत्र्य चळवळीशी निगडीत अशा एका शुभदिनी आपण स्वातंत्र्याच्या अमर युगाचा संकल्प पुढे नेत आहोत. विकसित भारताच्या उभारणीला गती देण्याच्या मोहिमेला आज अयोध्या नगरीतून नवी ऊर्जा मिळत आहे. याठिकाणी १५ हजार कोटींहून अधिक रक्कम जमा झाली असून विकासकामांची पायाभरणी आणि उद्धाटन करण्यात आले आहे', असंही मोदी म्हणाले.

### देशाचा मोदींवर विश्वास

यावेळी बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, आजकाल काही लोक मला विचारतात की, मोदींची गॅरंटी काय आहे. मी त्यांना सांगू इच्छितो की, लोकांचा हा विश्वास मिळवण्यासाठी मोंदींनी आयुष्य खर्ची घालवले. आज देशाला मोदींवर विश्वास आहे, कारण मोदी जे हमी (गॅरंटी) देतात ते पूर्ण करण्यासाठी रात्रंदिवस काम करतात. अयोध्या नगरीही याची साक्षीदार आहे. आणि आज मी अयोध्येतील जनतेला पुन्हा विश्वास देतोय की, अयोध्येचा सर्वोतोपरी विकासच करून दाखवेन असेही आश्वासन त्यांनी यावेळी अयोध्या वासियांना दिले.

## मविआच्या जागावाटपात काँग्रेसचा फॉर्म्युला ठरला; ठाकरे-पवार गटाला मान्य होणार का?

**दि.३०विदर्भ प्रजासत्ताक नवी दिल्ली**

आगामी लोकसभा निवडणुकीच्या दृष्टीने सगळेच राजकीय पक्ष तयारीला लागलेत. त्यात ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी आम्ही लोकसभेच्या २३ जागा लढवणार असं विधान केले. त्याचसोबत आम्ही दिल्लीतील काँग्रेस नेत्यांसोबत जागावाटपावर चर्चा करू. त्यात राज्यातील नेते नसतील असं म्हटलं होते. मात्र त्यावर काँग्रेस नेत्यांनी आक्षेप घेतला. आता नवी दिल्लीतल्या बैठकीत जागावाटपाबाबत काँग्रेसचा फॉर्म्युला ठरल्याची माहिती समोर आली आहे.

राज्यात लोकसभेच्या ४८ जागा असून महाविकास आघाडी एकत्रित निवडणुकीला सामोरे



जाणार आहे. दिल्लीच्या काँग्रेस बैठकीत ठरलेल्या फॉर्म्युल्यानुसार, महाविकास आघाडीत काँग्रेस २२, शिवसेना ठाकरे गट १८, राष्ट्रवादी शरद पवार गट ६ जागा आणि वंचित बहुजन आघाडीला २ जागा सोडण्यात येतील. हा फॉर्म्युला काँग्रेसकडून समोर आला आहे. दिल्लीत राज्यातील काँग्रेस नेत्यांकडून पक्षश्रेष्ठींनी आढावा घेतला. त्यात राज्यातील नेते कोणकोणत्या जागा लढवू इच्छितात, कोणत्या जागांसाठी इच्छुक आहेत यावर चर्चा झाली. या बैठकीतून काँग्रेस २२ जागांसाठी आग्रही असल्याचे दिसते. ठाकरे गटाला २३ जागा हव्या होत्या परंतु काँग्रेसची इतक्या जागा सोडण्याची तयारी नसल्याचे दिसून येते. एबीपी माझा या वृत्तवाहिनीने सूत्रांच्या हवाल्यानं ही बातमी दिली आहे.

२०१९ नंतरच्या घडामोडीत अनेक पक्षांची राजकीय परिस्थिती बदलली आहे. शिवसेनेने भाजपासोबत निवडणूक लढून १८ जागा जिंकल्या होत्या. मात्र आता ती स्थिती नाही. त्यात उद्धव ठाकरे-शरद पवार यांचा पक्ष फुटलेला आहे. या दोन्ही गटाचे चिन्ह कोणते असेल हेदेखील अद्याप निश्चित नाही. त्यामुळे लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला झुकतं माप द्यावे आणि विधानसभा तसेच प्रादेशिक निवडणुकीत उद्धव ठाकरे-शरद पवार गटाला झुकतं माप द्यावे अशी भूमिका काँग्रेस नेत्यांची आहे. कर्नाटक, तेलंगणासारख्या राज्यात काँग्रेसनं विजय मिळवत सरकार बनवलं आहे. त्यामुळे लोकसभेत महाराष्ट्रातही जास्तीत जास्त जागा जिंकण्यासाठी काँग्रेस प्रयत्नशील आहे. त्यात मविआच्या जागावाटपात काँग्रेस २२ जागांसाठी आग्रही राहणार असल्याचं कळालं आहे.

दरम्यान, शरद पवार-उद्धव ठाकरे गटात मातोश्रीत बैठक झाल्याची माहिती आहे. शरद पवार गटाकडून १०-११ जागा लढण्याची तयारी आहे. त्यात शिरूर, सातारा, माढा, बारामती, जळगाव, रावेर, दिंडोरी, बीड, भिवंडी, अहमदनगर या जागांसाठी पवार गट आग्रही आहे. जानेवारीत पुन्हा ठाकरे-पवार गटात बैठक होणार आहे. एकीकडे दिल्लीत काँग्रेस नेत्यांची बैठक आणि दुसरीकडे ठाकरे-पवार बैठक यामुळे जास्तीच्या जागा घेण्यासाठी मविआच्या सर्वच पक्षात चढाओढ लागल्याचं दिसून येते. त्यामुळे महाविकास आघाडीतील जागावाटपाचा तिढा सोडवण्यासाठी तिन्ही पक्षाचे नेते आग्रही आहेत.

## इंडिया आघाडीत बिघाडी; आता नेते काढू लागले एकमेकांच्या पक्षांची लायकी

**दि.३०विदर्भ प्रजासत्ताक नवी दिल्ली**

लोकसभा निवडणुकीसाठी इंडिया आघाडीच्या जागावाटपाची चर्चा सध्या जोरात सुरू आहे. कोणत्या पक्षाला किती जागा मिळणार, याबाबतीत आघाडीतील नेते दावे-प्रतिदावे करत आहेत. तर काही नेते थेट औकातीवर येऊ लागल्याने आघाडीमध्ये सगळं काही आलबेल नसल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे लोकसभेचा विजय तर दूरच पण जागावाटपाचा तिढा सोडवताना मोठी कसरत करावी लागणार आहे.

पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी राज्यात केवळ आपलाच पक्ष भाजपला टक्कर देऊ शकतो, असे म्हटले आहे. त्यामुळे काँग्रेस किंवा डाव्या पक्षांच्या पदरात जागावाटपादरम्यान काहीच पडणार नाही, असे संकेतच त्यांनी दिले आहेत. त्यातच तृणमूल काँग्रेसचे नेते कुणाल



घोष यांनी डाव्या पक्षांची औकात काढली आहे.

पश्चिम बंगालमध्ये आता डावे नाही. त्यांना टीएमसीसोबत बसण्याचाही अधिकार नाही, असा टोला घोष यांनी लगावला आहे. इंडिया आघाडी देशात भाजपविरोधात लढेल, तर बंगालध्ये तृणमूल आणि भाजप अशी लढाई होईल, असे ममता बॅनर्जी यांनी स्पष्ट केल्याचे घोष यांनी सांगितले. आम्ही २०२१ मध्ये भाजपला पराभूत केले आहे, अशी आठवणही त्यांनी करून दिली.

२०२१च्या निवडणुकीत काँग्रेस आणि सीपीआय (एम) यांना एकही जागा मिळालेली नाही. उलट मतविभाजनाचा फायदा भाजपला झाला. जागावाटपाचा अंतिम निर्णय ममता बॅनर्जी घेतील. राज्यात इतर कुणी उरलेले नाही. डाव्यांची टीएमसी सोबत बसण्याची औकात नाही, अशी टीका घोष यांनी केली आहे.

दरम्यान, महाराष्ट्रातील जागावाटपावरून शिवसेना आणि काँग्रेसमध्ये दावे-प्रतिदावे केले जात आहेत. काँग्रेसला शुन्यापासून सुरूवात करावी लागेल, असे विधान खासदार संजय राऊत यांनी केले आहे. तर काँग्रेसच्या नेत्यांनी त्यांना पक्षफुटीची आठवण करून दिली आहे. केंद्रीय पातळीवरच राज्यातील जागावाटपावर चर्चा होईल, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

## काँग्रेस नेते सुनील केदार यांचा जमीन अर्ज सत्र न्यायालयानं फेटाळला

**दि.३०विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमध्ये १५० कोटी रुपयांचा सरकारी रोखे खरेदी घोटाळा करणारे माजी मंत्री सुनील केदार यांना शनिवारी जोरदार दणका बसला. त्यांची दोषसिद्धीला स्थगिती आणि शिक्षा निलंबन व जामीन देण्याची विनंती सत्र न्यायालयाने नामंजूर केली. त्यामुळे आमदारकी परत मिळविण्याचे केदार यांचे मनसुबे उधळल्या गेले.

सत्र न्यायाधीश आर. एस. पाटील (भोसले) यांनी हा निर्णय दिला. २२ डिसेंबर रोजी अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालयाने केदार यांना भादंविच्या कलम ४०९ (शासकीय नोकर, आदींद्वारे विश्वासघात), ४०६ (विश्वासघात), ४६८ (बनावट



दस्तऐवज तयार करणे), ४७१ (बनावट दस्तऐवज खरे भासविणे) व १२०-ब (कट रचणे) या गुन्ह्यांतर्गत दोषी ठरवून कमाल पाच वर्षे सश्रम कारावास व एकूण १२ लाख ५० हजार रुपये दंड, अशी शिक्षा सुनावली. त्यामुळे केदार यांना राज्यघटनेतील आर्टिकल १९१(१) व लोकप्रतिनिधित्व कायद्यातील कलम ८ (३) अनुसार अपात्र ठरविण्यात आले.

यासंदर्भात विधिमंडळ सचिवालयाने २३ डिसेंबर रोजी अधिसूचना जारी केली. केदार यांना अपात्रतेची कारवाई रद्द करण्यासाठी दोषसिद्धीवर स्थगिती मिळविणे आवश्यक होते. परिणामी, त्यांनी याकरिता सत्र न्यायालयात अर्ज दाखल केला होता. तसेच जामीनही मागितला होता व संभावित अडचणी टाळण्यासाठी दंडाची संपूर्ण रक्कमही न्यायालयात जमा केली होती. परंतु, त्यांना दिलासा मिळाला नाही.

## उद्धव ठाकरेंचा अजितदादांना मोठा धक्का; कट्टर समर्थक ठाकरे गटात

**दि.३०विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

राजकीय वर्तुळातून मोठी बातमी समोर येत आहे. शिवसेना ठाकरे गटानं राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाला मोठा धक्का दिला आहे. अजित पवारांचे कट्टर समर्थक आणि पिंपरी चिंचवडचे माजी महापौर संजोग वाघेरे यांनी ठाकरे गटात प्रवेश केला आहे. वाघेरे यांनी आज उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीमध्ये ठाकरे गटात प्रवेश केला आहे.

अजित पवार यांचे कट्टर समर्थक अशी संजोग वाघेरे यांची ओळख आहे. ते पिंपरी चिंचवडचे माजी महापौर आहेत. वाघेरे यांनी मावळ लोकसभा मतदारसंघासाठी दोन वेळेस तयारी केली होती, मात्र त्यांना तिकीट मिळालं नाही. आता त्यांनी शिवसेना ठाकरे गटात प्रवेश केला आहे.

## धुमकेतू, उल्का वर्षाव, ग्रहण, प्रतियुती, ब्लू मून याची देही याची डोळा पाहता येणार; २०२४ मध्ये खगोलीय घटनांची रेलचेल

**दि.३०विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

२०२४ मध्ये अवकाशातील खगोल घटना अतिशय सुंदर व मनमोहक राहणार आहेत. नवीन वर्षात गूढ असणारे धुमकेतू आणि उल्का वर्षाव, सुंदर ग्रह दर्शन आणि युती-प्रतियुती, पिधान, पौर्णिमा, ब्लू मून, सुपरमून आणि सूर्य आणि चंद्र ग्रहणे पहावयास मिळणार आहे.

२०२४ मध्ये जवळ जवळ १० धुमकेतू सूर्याच्या जवळ येत असले तरी त्यापैकी ५ धुमकेतू पृथ्वीच्या थोडे जवळ येतील तेव्हा साध्या दुर्बिणीने किंवा द्विनेत्रीने बघण्याची संधी आहे. यातील २ धुमकेतू साध्या डोळ्याने दिसण्याची शक्यता आहे. सूर्य आणि चंद्र ग्रहण हे अवकाशातील सर्वाधिक सुंदर आणि कुतूहलाच्या घटना आहेत. परंतु, पुढील वर्षी भारतातून केवळ एक खंडग्रास ग्रहण दिसेल आणि तेही केवळ पश्चिम भारतातूनच दिसेल. त्यामुळे ग्रहणानी आपली निराशा केली आहे. १७-१८ सप्टेंबर २०२४ चे खंडग्रास चंद्रग्रहण हे केवळ पाश्चिम भारतातून दिसणार आहे.

उल्का वर्षाव अवकाशातील गूढ आणि कुतूहलाच्या खगोलीय घटना असतात. हा दरवर्षी घडणारा उल्का वर्षाव कमी अधिक प्रमाणात दिसणार आहे. निरभ्र रात्री चंद्र आणि ग्रहांची युती या नियमित दिसणार्या घटना आहेत. मात्र, अगदी जवळून घडणार्या युती मात्र दुर्लभ असतात. बहुतेक युती या चंद्रासोबत दिसतात. प्रतियुती मात्र बाह्य ग्रहांच्या बाबतीत घडतात. त्यात तेजस्वी दिसणार्या गुरु आणि शनी ग्रहाचीच युती



मनोहारी असणार आहे.

पृथ्वीच्या सूर्याभोवती, स्वताभोवती फिरण्यामुळे तसेच ग्रहांच्या फिरण्यामुळे ग्रहांच्या वेळा वर्षभर प्रत्येक महिन्यात बदलत असतात. त्यासाठी निरीक्षकांचे सातत्याने निरीक्षण असेल तर सहज ग्रहांच्या वेळा कळतात. पौर्णिमा दर महिन्याला घडणार्या घटना असल्या तरी प्रत्येक पौर्णिमा ही सारखी नसते. कधी चंद्र लहान तर कधी तो खूप मोठा दिसतो. ब्लू मूनला चंद्र निळा दिसत नसून एकाच महिन्यांतील दुसऱ्या पौर्णिमेला ब्लू मून म्हणतात. सुपरमून हा पृथ्वीच्या जवळ असणाऱ्या आणि मोठा चंद्र दिसणार्या पौर्णिमेला म्हणतात. या सर्व घटना वैज्ञानिक दृष्ट्या महत्त्वाच्या आणि मनोहारी असतात.२५ जानेवारीला लघु चंद्र पौर्णिमा, २४ फेब्रुवारीला लघु चंद्र पौर्णिमा, २५ मार्चला लघु चंद्र पौर्णिमा, २३ एप्रिलला पौर्णिमा, १९ ऑगस्टला सुपरब्लू मून, १७ ऑक्टोबर - सुपर मून दिसणार आहे. भारताची जगप्रसिद्ध खगोल संस्था इस्रो ही तिच्या विविध उपग्रहीय आणि ग्रहीय यशस्वी मोहिमेमुळे गाजत आहे. २०२४ मध्ये आदित्य एल १, इनसँट -३ डीएस, गगनयान १ चाचणी, निसार उपग्रह प्रक्षेपण, स्पाडेक्स उपग्रह, मंगळयान, शुक्रयान, एक्सपोसँट अवकाश वेधशाळा मोहिमा होणार आहेत. संपात दिवस म्हणजे ज्या दिवशी सूर्य २० मार्च आणि २२ सप्टेंबरला विषुववृत्तावर येतो तो दिवस या दिवशी थोड्या फार फरकाने दिवस- रात्र समान असते. अयनदिन २१ जून आणि २२ डिसेंबर या दिवशी येतात. उत्तरायण संपते तेव्हा उत्तर गोलार्धात दिवस मोठा आणि रात्र लहान तर दक्षिणायन संपते तेव्हा दिवस लहान आणि रात्र मोठी असते. ३ जानेवारीला पृथ्वी सूर्याजवळ, २० मार्चला संपात दिन, ९ मेला बुध क्षितिजावर सर्वाधिक वर, २१ जूनला-अयन दिन, २२ सप्टेबरला संपात दिन, २१ डिसेंबरला अयन दिन असणार असल्याचे स्काय वाच ग्रुपचे अध्यक्ष खगोल अभ्यासक सुरेश चोपणे यांनी सांगितले.

## संपादकीय ......

# विकसित भारतातील तरुणाईचे योगदान

*अलीकडच्या काळात प्रकाशित होणाऱ्या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय हवालात साधर्य असून डिजिटल कोशल्य आणि वेगवान आर्थिक विकासामुळे तरुणांसाठी देश आणि परदेशात रोजगार वाढीच्या संधी वाढणे आणि जागतिक मंदीच्या आव्हानादरम्यान भारत वेगाने विकासाकडे वाटचाल करत असल्याचे अधोरेखित होत आहे. आगामी काळात देशात स्किल इंडिया, डिजिटल इंडियाच्या माध्यमातून कौशल्य, शिक्षण आणि उद्योजकता वाढविण्यासाठी डिजिटल सार्वजनिक आराखड्याचा संपूर्णपणे लाभ घेत नव्या पिढीसाठी अधिकाधिक रोजगारनिर्मिती करावी लागणार आहे.*

*पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १२ डिसेंबर रोजी आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) आणि जागतिक सहकार्य (जीपीएआय)च्या शिखर संमेलनात बोलताना, 'एआय हे २१ व्या शतकातील विकासाचे सर्वात मोठे माध्यम ठरू शकते, असे सांगितले. याप्रमाणे भारतातील तरुणांची एआय कॉम्प्युटिंग क्षमता वाढविण्यासाठी लवकरच मोहीम सुरू केली जाणार असल्याचे संकेत मिळत आहे. देशभरातील ओद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय)च्या नेटवर्कचा वापर टीयर-२ आणि टीयर-३ शहरातील तरुणांमध्ये एआय कौशल्य वाढविण्यासाठी केला जाईल. या आधारावर नवीन पिढी स्टार्टअप आणि नवोन्मेष वाढवताना मानवी मूल्यांसह देशाला वेगवान विकासाच्या वाटेवर नेतील.*

*११ डिसेंबर रोजी पंतप्रधान मोदी यांनी विकसित भारत-२०४७: तरुणांचा आवाज' या कार्यक्रमात व्हर्चुअली मार्गदर्शन केले. ते म्हणाले, भारताचा हा अमृतकाळ असून, हा या काळात नवीन पिढी राष्ट्राच्या जडणघारुणीचा संकल्प करत २०४७ पर्यंत देशाला विकसित करण्याचे स्वप्न साकारू शकते. यादरम्यान नीती आयोगाने दहा डिसेंबरला देशाच्या विकासाबाबत एक निवेदन जारी केले. त्यात म्हटले, केंद्र सरकारकडून राबविण्यात येणारी धोरणे म्हणजे 'पंतप्रधान कौशल्य विकासः, सर्वंकष शिक्षण अभियान, 'जनधन योजना, 'स्टार्टअप इंडिया' आणि उच्च तंत्रज्ञान शिक्षणविस्तार कार्यक्रम हे यशस्वीरीत्या पुढे नेण्यात येत असून, त्यानुसार भारत डिजिटल कौशल्यप्राप्त नव्या पिढीच्या आधारावर आणि वेगवान आर्थिक विकासाच्या बळावर २०२७ पर्यंत जगातील तिसरी मोठी अर्थव्यवस्था होऊ शकतो. तसेच २०४७ पर्यंत ३० खर्व डॉलरची अर्थव्यवस्था होताना विकसित देश म्हणून नावारूपास येताना दिसेल. अर्थात, अलीकडच्या काळात प्रकाशित होणाऱ्या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय अहवालात साधर्म्य असून, डिजिटल कौशल्य आणि वेगवान आर्थिक विकासामुळे तरुणांसाठी देश आणि परदेशात रोजगार वाढीच्या संधी वाढणे आणि जागतिक मंदीच्या आव्हानादरम्यान भारत वेगाने विकासाकडे वाटचाल करत असल्याचे अधोरेखित होत आहे.आगामी काळात तरुणांना चांगले इंग्रजी, कॉम्प्युटर, आयटी कौशल्य, कोडिंग स्किल्स, कम्युनिकेशन स्किल्स, दळणवळण, वेब डिझाईन, कौशल्य विकास, संशोधन, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, ऑटोमेशन, क्लाऊड कम्पाऊंडिंग, मशिन उर्निंग, डेटा सायन्ससारख्या प्रगतशील तंत्रज्ञानाने सुसज्ज केले जाईल. आता देशात स्किल इंडिया डिजिटल माध्यमातून कौशल्य, शिक्षण आणि उद्योजकता वाढविण्यासाठी डिजिटल सार्वजनिक आरखड्याचा संपूर्णपणे लाभ घेत नव्या पिढीसाठी अधिकाधिक रोजगारनिर्मिती करावी लागणार आहे. त्याचबरोबर देशभरात यावर्षी २०२३-२४ मध्ये पंतप्रधान कौशल्य विकास योजना ४.० च्या माध्यमातून तरुणांना निश्चित केलेल्या तंत्रज्ञान क्षेत्रात मोठ्या प्रमाणात कौशल्य आणि प्रशिक्षणाच्या माध्यमातून रोजगाराच्या दिशेने न्यावे लागेल. भारताच्या आर्थिक विकासाचा हाच मोठा आधार आहे. विकसित भारत करण्यासाठी २०४७ पर्यंत सलग ७ ते ८ टक्के दराने वाटचाल करावी लागेल,*

# कोरोना जेएन-वन व्हेरिएंट: आरोग्य यंत्रणेच्या सज्जतेचा आढावा

## नागरिकांनी घाबरून न जाता कोविड मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करण्याचे जिल्हाधिका-यांचे आवाहन



**दि.३०विदर्भ प्रजासत्ताक अमरावती–** कोविड जेएन-वन या व्हेरियंटचा प्रसार जगभर वेगाने होत आहे. यासाठी पुर्वानूभव लक्षात घेता वेळीच दक्षता आणि सावधगिरी बाळगणे गरजेचे आहे. जिल्ह्यातील शासकीय रुग्णालयातील कोविड संबंधित यंत्रणा सुसज्ज ठेवावी. येणाऱ्या संभाव्य परिस्थितीला तोंड देण्यासाठी डॉक्टरांचे पथक, मुबलक औषधसाठा व कोविड तपासणी किट उपलब्ध करून देण्यात येईल .नागरिकांनी घाबरून न जाता कोविड मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी आज येथे केले .

कोविड - १९ च्या नव्याने उद्भवलेल्या व्हेरियंटचा प्रादुर्भावाबाबत जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्या अध्यक्षतेखाली महसूल भवन येथे आढावा बैठक घेण्यात आली , त्यावेळी ते बोलत होते. मुख्य कार्यकारी अधिकारी अविष्यांत पंडा, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दिलीप सौंदळे, जिल्हा आरोग्य अधिकारी संजय आसोले तसेच विविध विभाग प्रमुख यावेळी उपस्थित होते.

कोविडच्या नव्याने निर्माण झालेल्या जेएन-वन या व्हेरियंटबाबत नागरिकांनी घाबरून न जाता दक्षता बाळगणे गरजेचे असल्याचे सांगून श्री. कटियार म्हणाले की, आपण सर्वांनी एकत्रितपणे काम करून कोविडच्या लाटेला थोपविण्यात यश मिळविले आहे. आता नव्याने आलेल्या जेएन-वन या नवीन व्हेरियंटवरही सर्वांच्या सहकार्याने मात करावयाची आहे. याबाबत सावधगिरी बाळगण्याबाबत केंद्र शासनामार्फतही सूचना आल्या आहेत. जेएन-वन व्हेरियंट झपाट्याने वाढत आहे. परंतु नागरिकांनी न घाबरता कोविड मार्गदर्शक तत्वे तसेच त्रिसुत्रींचे पालन करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

शासकीय रुग्णालयात कोविड तपासणी सुविधेसाठी आरटीपीसीआर मशिन अद्ययावत कराव्यात. त्यासाठी पुरेशा किटचा पुरवठा उपलब्ध करून द्यावा. रुग्णांची चाचणी पॉझिटिव्ह आल्यास संबंधित रुग्णाला योग्य तो औषधोपचार उपलब्ध करून द्यावे. वैद्यकीय रुग्णालयात येणाऱ्या सर्व संशयित रुग्णांची तपासणी करून माहिती संकलित करावी. नागरिकांनी वैयक्तिक स्तरावर मास्क वापरणे, हातांची स्वच्छता, सामाजिक अंतर राखणे याबाबींचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन श्री. कटियार यांनी केले आहे.

यासंदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नुकतीच राज्यातील प्रशासकीय यंत्रणा तसेच आरोग्य यंत्रणेची आढावा बैठक घेतली. मागील अनुभवाच्या आधारे आताही राज्यातील यंत्रणा संपूर्णपणे सज्ज आहे. त्यामुळे घाबरण्याचे कारण नाही. नागरिकांनी सर्दी, खोकला, ताप यासारखी लक्षणे दिसल्यास त्यांनी तात्काळ तपासणी करुन घ्यावी. आगामी सण व नववर्षाचे स्वागत या पार्श्वभूमीवर गर्दीच्या ठिकाणी जाताना मास्क वापरावा. आपल्यामुळे इतरांना संसर्ग होणार यासाठी काळजी घ्यावी. सोशल मीडियावरून तसेच प्रसारमाध्यमांनीही या नव्या व्हेरिएंट संदर्भात चुकीच्या बातम्या प्रसारित होणार नाहीत याची दक्षता घ्यावी . जेणेकरून लोकांमध्ये संभ्रम वा घबराट निर्माण होणार नाही, अफवा पसरणार नाहीत. माहिती प्रसारीत करताना अधिकृत माहितीचाच उपयोग करावा, असे आवाहन मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी केले.

# 3 जानेवारीला पृथ्वीचे सूर्यापासून सर्वांत कमी अंतर; खगोलतज्ज्ञांची माहिती

## मानवी जीवनावर कोणताही अनिष्ट परिणाम नाही



**दि.३०विदर्भ प्रजासत्ताक अमरावती :** पृथ्वी सूर्याभोवती फिरते; परंतु अचूक वर्तुळाकार मार्गाने फिरत नाही तर लंब वर्तुळाकार मार्गाने फिरत असते. कधी सूर्यापासून लांब असते, तर कधी सूर्यापासून जवळ असते. साधारणपणे ३ जानेवारीदरम्यान पृथ्वी ही सूर्यापासून सर्वांत कमी अंतरावर असते. हे अंतर १४.७१ कोटी कि.मी. राहत असल्याची माहिती खगोलतज्ज्ञांनी दिली.

### सूर्याचे आयुष्य १० अब्ज वर्षे

सूर्याला आकाशगंगेच्या मध्याभोवती एक चक्कर मारण्यास २२५ दशलक्ष वर्षे लागतात. सूर्य हा आकाशगंगेच्या मध्याभोवती २५० किमी प्रति सेकंद या वेगाने फिरत आहे. आजपर्यंत सूर्याचे २० चक्कर पूर्ण झाले. सूर्याचे वय निश्चित करणारे पहिले वैज्ञानिक सर आर्थर एडिंग्टन आहेत. सूर्याचे एकूण आयुष्य १० अब्ज वर्षे आहे, त्यापैकी पाच अब्ज वर्षे संपले आहेत. म्हणजेच पाच अब्ज वर्षांनी सूर्याचा मृत्यू हा श्वेत व बटू ताऱ्यात होईल.

नेहमी हे अंतर सरासरी १५ कोटी किमीदरम्यान असते. या दिवशी पृथ्वी जुलै महिन्याच्या तुलनेत ५० लाख कि.मी.ने सूर्याच्या जवळ राहणार आहे. पृथ्वी व सूर्य यांच्यातील अंतर कमी असण्याच्या घटनेला 'उपसूर्य' असे म्हणतात.

सूर्य हा तप्त वाळूचा गोळा असून यामध्ये हायड्रोजनपासून हेलियम बनण्याची क्रिया अहोरात्र सुरू राहते. सूर्याच्या केंद्रामध्ये एका सेकंदात ६५ कोटी ७० लाख टन हायड्रोजन जळतो व त्यापासून ६५ कोटी २५ लाख हेलियम तयार होते.

हा शोध सन १९३९ मध्ये हॅन्स बेथ या वैज्ञानिकाने लावला. सूर्यावर ज्या भागावर तापमान कमी होते त्या भागावर सौर डाग पडतात. या डागाचे चक्र ११ वर्षांचे असते. या डागाचा शोध सन १९८३ मध्ये श्वाबे नावाच्या वैज्ञानिकांनी लावला आहे. या डागाचे आतापर्यंत २३ चक्र पूर्ण झाले. फेब्रुवारी २००८ पासून २४ वे चक्र सुरू झाले आहे. या खगोलीय घटनेचा मानवी जीवनावर कोणताही परिणाम होणार नसल्याची माहिती मराठी विज्ञान परिषदेचे विभागीय अध्यक्ष प्रवीण गुल्हाने व हौशी खगोल अभ्यासक विजय गिरुळकर यांनी दिली.




## सावधान! तुम्हीसुद्धा खाद्यपदार्थ ॲल्युमिनियम फॉईलमध्ये पॅक करत असाल तर, 'या' आजारांना आमंत्रण देताय

**दि.३०विदर्भ प्रजासत्ताक** आजकाल खाद्यपदार्थ पॅकिंगसाठी ॲल्युमिनियम फॉईलचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. बरेच लोक ते आरोग्यासाठी हानिकारक मानतात. मात्र, त्यामुळे कोणते नुकसान होऊ शकते याची माहिती फार कमी लोकांना असते. जर तुम्ही देखील अन्न पॅक करण्यासाठी ॲल्युमिनियम फॉईलचा वापर करत असाल, तर फॉईल पेपरचा वापर करावा की करू नये या संदर्भात अधिक माहिती जाणून घेऊयात.



**ॲल्युमिनियम फॉईलमध्ये अन्न साठवण्याचे तोटे–** तज्ज्ञांच्या मते, ॲल्युमिनियम फॉईलचा वापर आरोग्यासाठी हानिकारक आहे. जेव्हा आपण अन्न उबदार ठेवण्यासाठी ॲल्युमिनियम फॉईल वापरतो तेव्हा आपण त्यात गरम अन्न पॅक करतो. जेव्हा गरम अन्न ॲल्युमिनियम फॉईलमध्ये गुंडाळले जाते तेव्हा ॲल्युमिनियमचे घटक अन्नामध्ये प्रवेश करतात. असे अन्न दीर्घकाळ खाल्ल्याने स्मृतिभ्रंश होण्याची शक्यता असते.

**तज्ञ काय म्हणतात?**

ॲल्युमिनियम फॉईलमध्ये खाद्यपदार्थ पॅक करणं ठीक आहे. पण, ते जास्त काळ वापरल्यास आरोग्याला नुकसान पोहोचू शकते. असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. विशेषत: जेव्हा आम्लयुक्त आणि खारट अन्न जास्त काळ ॲल्युमिनियम फॉईलमध्ये ठेवले जाते. या रासायनिक अभिक्रियामुळे चव बदलू शकते आणि यकृत आणि मूत्रपिंडाशी संबंधित समस्या उद्भवू शकतात. पॅक्ड फूडमध्ये जास्त वेळ ओलावा साठल्याने बॅक्टेरिया वाढण्याची समस्याही उद्भवू शकते. त्याच वेळी, सायट्रिक किंवा आंबट गोष्टी ॲल्युमिनियम फॉईलमध्ये गुंडाळले जातात तेव्हा आंबट गोष्टी ॲल्युमिनियमवर प्रतिक्रिया देतात आणि रासायनिक प्रक्रियेमुळे पोटाला नुकसान पोहोचू शकते. त्यामुळे पचनाच्या समस्याही उद्भवू शकतात.

अनेक गंभीर आजारांचा धोका

तज्ज्ञांच्या मते, ॲल्युमिनियम फॉईलमध्ये जास्त काळ ठेवलेले अन्न खाल्ल्याने पुरुषांमध्ये वंध्यत्वाची गंभीर समस्या वाढू शकते. यामुळे हाडांच्या विकासावरही परिणाम होऊ शकतो. त्याचबरोबर किडनीचा त्रासही होऊ शकतो. याशिवाय ॲल्युमिनियमच्या भांड्यांमध्ये अन्न शिजवणे, साठवणे आणि खाल्ल्याने शरीरात अनेक घातक घटक जमा होतात आणि त्यामुळे दमा, यकृत आणि कमकुवत प्रतिकारशक्ती यांसारख्या समस्या उद्भवू शकतात. त्यामुळे, तुम्ही जर ॲल्युमिनियम फॉईलचा वापर करत असाल तर तो जपून करा तसेच दिर्घकाळासाठी करू नका.

# वराहाच्या नमुन्यात सापडला आफ्रिकन स्वाइन फिव्हर; फरमानपूर बाधित क्षेत्र घोषित

## फरमानपूर बाधित क्षेत्र अन् एक किमी परिसर संनियंत्रण क्षेत्र जिल्हाधिकाऱ्यांद्वारा घोषित

**दि.३०विदर्भ प्रजासत्ताक अमरावती :** अचलपूर तालुक्यातील मौजा फरमानपूर येथील मृत वराहाच्या घेण्यात आलेल्या नमुन्यात आफ्रिकन स्वाइन फिव्हर आढळून आलेला आहे. रोगाचा प्रादुर्भाव रोखणे व प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी मौजा फरमानपूर या भागाचे एक किमी परिघातील क्षेत्रास बाधितक्षेत्र व दहा किमी परिघातील क्षेत्रास संनियंत्रण क्षेत्र घोषित करण्यात आले असल्याचे जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी शुक्रवारी आदेशित केले आहे.



बाधित क्षेत्राच्या एक किमी परिसरातील सर्व वराहांचे कलिंग करून त्याची विल्हेवाट शास्त्रीय पद्धतीने लावून त्या परिसराचे निर्जंतुकीकरण करावे. आफ्रिकन स्वाइन फिव्हर या रोगाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी बाधित परिसरातील सक्रिय संनिरीक्षण व्यापक प्रमाणावर करावे व सुयोग्य जैवसुरक्षा उपाययोजना कराव्यात. पाळीव तसेच जंगली वराहातील अनियमित वर्तणुकीवर बारकाईने लक्ष ठेवण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत. याशिवाय वराहाच्या मांसाची विक्री करणाऱ्या आस्थापनांची नोंदणी करण्याची प्रक्रिया पूर्ण करून त्या आस्थापनांना स्थानिक पशुवैद्यकीयांनी नियमित भेटी देऊन नियंत्रण ठेवावे, तसेच वराहपालन करणाऱ्या सर्व आस्थापनांनी स्वच्छता व जैव सुरक्षा उपाययोजनांची कडक अंमलबजावणी करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत.

# अमरावती जिल्ह्यात ५ नवे रुग्ण आढळले

**दि.३०विदर्भ प्रजासत्ताकअमरावती –** अमरावती जिल्ह्यात पुन्हा एकदा कोरोनाचा प्रादुर्भाव वाढत असल्याचे दिसून येत आहे.




गुरुवारी ५ नव्या कोरोना बाधित रुग्णांची नोंद आरोग्य प्रशासनाने केली आहे.प्राप्त माहितीनुसार ५२ संशयित रुग्णांचे सॅम्पल हे संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. यातील ५ रुग्णांचा अहवाल म्हणजेच दहा टक्के रुग्णांचे अहवाल कोविड पॉझिटिव्ह आढळून आला आहे. यामध्ये अमरावती शहरातील २ रुग्ण असून ३ रुग्ण हे विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयात उपचारासाठी आलेले रुग्ण आहेत. यातील एक महिला रुग्ण अकोला जिल्ह्यातील असल्याची प्राथमिक माहिती आरोग्य विभागाकडून मिळालेली आहे.

# राष्ट्रीय कृषी प्रदर्शनात 'रावण'चाच बोलबाला; दोन दिवसांत दीड लाख शेतकरी, नागरिकांच्या भेटी

**दि.३०विदर्भ प्रजासत्ताक अमरावती :** डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या १२५व्या जयंतीनिमित्त १०० एकर परिसरात राष्ट्रीय कृषी प्रदर्शन सध्या सुरू आहे. यामध्ये तब्बल ५१२ स्टॉल्स शेतकरी व नागरिकांचे लक्ष वेधत आहेत. दोन दिवसांत १.२० लाखाच्या गर्दीने उच्चांक गाठला आहे. नांदेड जिल्ह्यातील सुनेगाव येथील चरा वर्षाचा, आठ फूट लांब, ६.२ फूट उंची व एक टन वजनाच्या लाल कंधारी 'रावण' हा वळू लक्षवेधी ठरला आहे.

भारत स्वतंत्र होऊन जेमतेम कारभाराला सुरुवात झाली असतानाच देशाचे प्रथम कृषिमंत्री डॉ. पंजाबराव देशमुख यांनी सन १९५९-६० मध्ये दिल्ली येथे पहिले जागतिक कृषी प्रदर्शन आयोजित केले होते. त्याचीच आठवण म्हणून श्री शिवाजी शिक्षण संस्थेद्वारा येथील कृषी महाविद्यालयात २७ ते ३० डिसेंबरदरम्यान राष्ट्रीय कृषी प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. या प्रदर्शनाला शेतकऱ्यांची मोठी गर्दी होत असल्याची माहिती आयोजन समितीचे प्रा. सी. एम. देशमुख यांनी सांगितले.



कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# आता नायलॉन मांजा विकणाऱ्यांची काही खैर नाही

## फौजदारी गुन्हे नोंदविणार सायबर सेल चे ही राहणार लक्ष

**दि.३०विदर्भ प्रजासत्ताक अमरावती :** प्रतिबंधित नायलॉन मांजाच्या विक्री व वापराविरुद्ध पोलिस प्रशासन ॲक्शन मोडवर आले असून, नायलॉन मांजा बाळगणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याचे आदेश पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी दिले आहेत. त्यानुसार, गुरुवारीच नायलॉन मांजा विक्री करणाऱ्या दोघांवर फौजदारी कारवाईचा दंडुका उगारण्यात आला. पोलिस आयुक्तांच्या आदेशान्वये शहरात येत्या ३१ जानेवारीपर्यंत मांजा प्रतिबंधात्मक मनाई आदेश लागू करण्यात आले आहेत मकरसंक्रांतीचा सण १४ जानेवारी रोजी असून, या काळात अनेक नागरिक मोठ्या प्रमाणावर पतंग उडवतात. त्यासाठी मोठ्या प्रमाणात प्रतिबंधित नायलॉन मांजाची खरेदी-विक्री केली जाते. नायलॉन मांजाच्या वापरामुळे शहरातील बऱ्याच नागरिकांना गंभीर स्वरूपाच्या जखमा झाल्या आहेत. एका तरुणीला जीव गमवावा लागला. गळा कापणे, चेहरा विद्रूप होणे, नाक, कान व गालावर गंभीर जखमा होणे तसेच नायलॉन मांजास अडकून दुचाकी वाहनचालकांना गंभीर अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. नायलॉन मांजा नागरिकांच्या जीविताला व आरोग्याला धोका निर्माण करतो. त्यामुळे पर्यावरणास धोका संभवतो. त्यादृष्टीने शहर पोलीस आयुक्तांनी प्रतिबंधित आदेश काढून अमरावतीकरांना नायलॉन मांजा न वापरण्याबाबत सजग केले आहे.



### मनाई आदेश जाहीर

नायलॉन मांजाची कुरिअरद्वारे वाहतूक क कलम १४४ फौजदारी प्रक्रिया संहिता १९५ मनाई आदेश जाहीर वेशले. सोबतच महापा क्षेत्रात झोननिहाय टास्क फोर्स समित्या ग करण्यात आल्या आहेत. मकर संक्रांतीच्य कालावधीत नायलॉन मांजा, प्रतिबंधित सा कॉमर्सद्वारे पुरविण्यास प्रतिबंध घातला आहे.



दि. २८ डिसेंबर ते ३१ जानेवारी २०२४ या कालावधीत कुणीही नायलॉन मांजा ऑनलाइन पद्धतीने किंवा कुरिअरद्वारे खरेदी, विक्री, पुरवठा व जवळ बाळगताना आढळल्यास सबंधितांविरुद्ध कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल. पोलिस ठाणेनिहाय नायलॉन मांजाविरोधात कारवाई करीत गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिले आहेत.

**- नवीनचंद्र रेड्डी, पोलिस आयुक्त,**

## ४ जानेवारीला जळगाव जामोद येथे

# 'पत्रकारांचे एक दिवसीय खुले राज्यस्तरीय अधिवेशन'

### अ.भा.ग्रा.पत्रकार संघ व आम्ही जळगावकर पत्रकार यांचे आयोजन

**दि.२९ विदर्भ प्रजासत्ताकचांदूर रेल्वे:-** अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाचे एक दिवसीय खुले राज्यस्तरीय अधिवेशन गुरुवार, ४ जानेवारी २०२४ रोजी जळगाव जामोद येथील बऱ्हाणपूर रोडवर असलेल्या देवाशिष लॉन्स येथे आयोजित केले आहे. या अधिवेशनाचे आयोजक अखिल भारतीय पत्रकार संघ असुन संयोजक आम्ही जळगांवकर पत्रकार आहे. या अधिवेशनाच्या प्रथम सत्रात सकाळी १० ते दुपारी १ वाजतापर्यंत उद्घाटन समारंभ होणार आहे. याचे उद्घाटक माजी मंत्री,आमदार डॉ. संजय कुटे यांच्या हस्ते होणार आहे. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अध्यक्ष खासदार प्रतापराव जाधव व प्रमुख उपस्थिती म्हणून खामगाव विधानसभा मतदार संघाचे आमदार आकाश फुंडकर, राज्य पत्रकार अधिस्विकृती समितीचे अध्यक्ष तथा दै.लोकमत मुंबई चे सहयोगी संपादक यदु जोशी,विशेष उपस्थिती म्हणून आय.एन.एस. समिती, नवी दिल्ली चे कार्यकारी सदस्य तथा दै. हिन्दुस्थानचे प्रबंध संपादक विलास मराठे, अमरावती विभागीय अधिस्विकृती समितीचे सदस्य तथा दै. वृत्तकेसरी अमरावतीचे संपादक जयराम आहुजा आदींची उपस्थिती राहणार आहे.तर व्दितीय सत्र दुपारी २.३० वाजता ते ४ वाजतापर्यंत होणार आहे. या सत्राला प्रमुख उपस्थिती म्हणून महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या सचिव डॉ.स्वाती संदिप वाकेकर, जळगाव जामोद कृ.उ.बा.समिती चे सभापती प्रसेनजीत पाटील, राजर्षी शाहू परिवार तथा संकल्पक वन बुलढाणा मिशन चे अध्यक्ष संदिप शेळके, दै. महासागरचे संपादक श्रीकृष्ण चांडक, अमरावती विभागीय अधिस्विकृती समितीचे अध्यक्ष रवींद्र लाखोडे, नागपूर विभागीय अधिस्विकृती समितीचे अध्यक्ष रमेश कुळकर्णी, अमरावती विभागीय अधिस्विकृती समिती सदस्य राजेंद्र काळे, सुरेंद्रकुमार आकोडे, गोपाल हरणे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहे. तर समारोपीय सत्र हे दुपारी ४ ते दुपारी ५ वाजतापर्यंत राहणार आहे. या सत्राच्या अध्यक्षस्थानी अ.भा. ग्रामीण पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष मनोहर सुने राहणार असुन प्रमुख उपस्थिती म्हणून अ.भा. ग्रामीण पत्रकार संघाचे केंद्रीय कार्याध्यक्ष युसूफ खान यांची उपस्थिती राहणार आहे. या दरम्यान अधिस्विकृती बाबत मार्गदर्शन व आजची पत्रकारीता या विषयावर राज्य पत्रकार अधिस्विकृती समितीचे अध्यक्ष यदु जोशी हे मार्गदर्शन करणार आहे. तरी या अधिवेशनाला राज्यातील सर्व पत्रकार बंधुंनी उपस्थित राहावे असे आवाहन संस्थापक अध्यक्ष मनोहर सुने, केंद्रीय कार्याध्यक्ष युसूफ खान, केंद्रीय महासचिव सुरेश सवळे, केंद्रीय सचिव अशोक पवार, महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष कैलासबापू देशमुख, महिला मंच प्रदेश अध्यक्ष जयश्री पंडागडे, केंद्रीय उपाध्यक्ष राजेंद्र भुरे, केंद्रीय कोषाध्यक्ष अशोक यावूल, केंद्रीय सदस्य माणिक ठाकरे, प्रदीप जोशी, केंद्रीय विधी सल्लागार ड. किरण भुते, केंद्रीय संपर्क प्रमुख प्रा.रवींद्र मेंढे, केंद्रीय सदस्य बाळासाहेब सोरगीवकर, मनोहर चरपे, संजय कदम, अभिमन्यू भगत, अंबादास सिनकर, कार्यालय प्रमुख बाबाराव खडसे यांच्यासह अ.भा.ग्रा. पत्रकार संघ,जळगाव जामोद तालुका कार्यकारीणी यांनी केले आहे.

# एकीकडे थंडीची लाट, तर दुसरीकडे पावसाचा अंदाज


**दि.३०विदर्भ प्रजासत्ताक नागपूर :** भारतातील हवामानात सातत्याने बदल होत असून हिवाळ्यात पावसाळा असेच काहीसे चित्र गेल्या काही वर्षांत तयार झाले आहे. एकीकडे थंडीची लाट असताना, पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. उत्तर भारतात थंडी तर दक्षिण भारतात पावसाची रिपरिप बघायला मिळत आहे. वेस्टर्न डिस्टर्बन्स मुळे हवामानावर सातत्याने परिणाम होत आहे.



दिल्ली, हरियाणा, पंजाब ही राज्ये दाट धुक्यात हरवली असून महाराष्ट्रातदेखील काही जिल्ह्यांवर कमीअधिक प्रमाणात धुक्याची चादर दिसून येत आहे. उत्तर भारतात नवीन वर्षाच्या पहिल्या आठवड्यापर्यंत ही धुक्याची चादर अशीच कायम राहणार आहे. वेस्टर्न डिस्टर्बन्स चा परिणाम हवामानावर होत असून देशाच्या काही भागांत पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.महाराष्ट्रात धुक्याची चादर असली तरी येथेही पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. तसेच राजस्थानमध्येदेखील पावसाची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. तसेच तमिळनाडूतदेखील पावसाचा अंदाज देण्यात आला आहे. उत्तर-पश्चिम भागात दाट धुके तर काही भागांत पाऊस अनुभवायला मिळणार आहे.

# राष्ट्रसंताच्या गुरुकुंज आश्रमाला तीर्थक्षेत्राचा 'अ' दर्जा

**दि.३० विदर्भ प्रजासत्ताक ७ गुरुकुंज मोझरी-** राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज यांच्या पावनभूमीतील महाराजांनी स्थापन केलेल्या श्री क्षेत्र गुरुकुंज आश्रमाला चक्क २० वर्षानंतर तीर्थक्षेत्राचा 'अ' दर्जा शासनाकडून प्राप्त झाल्याने गुरुदेवभक्तांमध्ये आनंदाची लाट निर्माण झाली आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे महासमाधी स्थळ हे देश-विदेशातील लाखो भाविकांचे एक श्रद्धास्थान आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी सन १९३५ मध्ये राष्ट्रीय महामार्गावर श्रीक्षेत्र गुरुकुंज-आश्रमाची स्थापना करून गुरूदेवनगर या स्वतंत्र गावाची स्थापना केली. श्री क्षेत्र गुरुकुंज आश्रम हे स्वातंत्र्यपूर्व लढ्यातील महत्त्वाचे केंद्र होते. या स्थळास तत्कालीन राष्ट्रीय नेत्यांनी अनेकदा नियमित भेटी दिल्या. त्यामुळे मानवतेचे दर्शन घडणार्या या तीर्थक्षेत्राला शासनाकडून 'अ' दर्जा मिळावा, ही मागणी अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळाने २००५ पासून रेटून धरली होती. आज २० वर्षानंतर गुरुदेवभक्तांच्या या मागणीला यश मिळाले आहे.



### गुरुदेवभक्तामध्ये आनंदाची लाट

### तीर्थक्षेत्राचे महत्त्व : २० वर्षांपासून मागणी

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी आपल्या भजन-भाषणातून तमाम भारतीय जनतेमध्ये राष्ट्रभक्ती जागृत केली. त्याचाच परिणाम म्हणून आष्टी, चिमूर, बेनोडा, यावली आदी ठिकाणी स्वातंत्र्य संग्राम घडून आला.राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या 'झाड झडूले शस्त्र बनेंगे, भक्त बनेंगी सेना, पत्थर सारे बॉम्ब बनेंगे नाव लगेगी किनारे' या भजनाने चिमूर येथे स्वातंत्र्य संग्राम होऊन भारतास स्वातंत्र्य मिळण्याआधी स्वतंत्र झालेले ते एकमेव गाव होय. हा एक मोठा इतिहास आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी श्रीक्षेत्र गुरुकुंज आश्रम येथे अखिल भारतीय श्रीगुरुदेव सेवामंडळ या सेवाभावी संस्थेची स्थापना केली. या संस्थेच्या माध्यमातून माणसास-माणूस बनविण्याचे कार्य सुरू केले. ते आजतागायत अविरत सुरू आहे. ११ ऑक्टोबर १९६८ ला पृथ्वीतलावरील आपले जीवन कार्य संपविल्यानंतर त्यांच्याच इच्छेप्रमाणे व जागा निश्चित केल्याप्रमाणे त्यांची महासमाधी बांधण्यात आली. या स्थळास देशविदेशासह लाखो भाविक, अभ्यासक व पर्यटक नियमित भेटी देतात. या स्थळाचे राष्ट्रीय तथा राष्ट्रकार्यातील महत्त्व लक्षात घेता या स्थळास 'अ' वर्ग तिर्थक्षेत्र दर्जा प्राप्त व्हावा याकरिता संस्थेचे सरचिटणीस जनार्दन बोथे यांनी सन २००५ पासून सतत पाठपुरावा केला.

संस्थेकडून व गुरुदेवभक्ताकडून होत असलेल्या सततच्या या मागणीकरिता संस्थेचे संचालक असलेले सुधीर मुनगंटीवार व बंटी भांगडीया यांनी प्रत्यक्ष लक्ष घालून तसेच भाजपाचे तिवसा विधानसभा प्रमुख राजेश वानखडे यांनी सतत प्रयत्न करून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आग्रही भूमिका मांडून या स्थळास 'अ' वर्ग दर्जा प्राप्त करून घेतला.याबद्दल लाखो गुरुदेव भक्त कायमचे ऋणी झाले. या स्थळास 'अ' वर्ग दर्जा प्राप्त झाल्याचा शासन निर्णय २८ डिसेंबर २०२३ ला निर्गमित झाल्याने गुरुदेव भक्तांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. संस्थेचे सर्वाधिकारी लक्ष्मण गमे यांनी महाराष्ट्र शासन, ग्रामपंचायत गुरुदेवनगर व या कार्यास सहकार्य करणार्या सर्व नेते व पदाधिकार्यांचे आभार मानले आहे.

# विदर्भ राज्य आंदोलन समितीचा चक्काजाम

## निंभी येथे रोखली वाहतूक शेतकरी संघटनेचाही सहभाग

**दि.३०विदर्भ प्रजासत्ताक मोर्शी -** मोर्शी ते अमरावती राज्य महामार्गावरील मोर्शी तालुक्यातील निंभी येथील बस थांब्यावर शुक्रवार, २९ डिसेंबर दुपारी १ वाजता विदर्भ राज्य आंदोलन समिती व शेतकरी संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने कापसाला भाव, वेगळा विदर्भ, शेतकरी विरोधी धोरणे अशा विविध मागण्यांकरिता सुमारे एक तास चक्काजाम आंदोलन छेडण्यात आले.शेतकर्यांवरील अन्यायाने सीमा ओलांडली आहे. शेतकर्यांना उत्पादन खर्चही हातात पडू नये अशी बाजार व्यवस्था शासनाने निर्माण केली आहे. सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणामुळे व बाजारपेठेच्या हस्तक्षेपामुळे शेतकरी हा पूर्णतः हवालदिल झाला आहे; म्हणून परिणामी शेतकरी आत्महत्या होत आहे. परंतु या निर्दयी सरकारला जाग येत नाही की, झोपेचे सोंग घेऊन नाटक करीत आहे, अशी टीका करीत विदर्भ राज्य आंदोलन समितीचे जिल्हाध्यक्ष गणेश कुसराम यांनी वेगळा विदर्भ झालाच पाहिजे, कापसाला भाव मिळालाच पाहिजे, अशा घोषणा देत सरकारला धारेवर धरले.विदर्भ राज्य संघर्ष समिती व कोअर समिती सदस्य दिलीप भोयर यांच्या मार्गदर्शनात व विदर्भ राज्य आंदोलन समितीचे जिल्हाध्यक्ष गणेश कुसराम यांच्या नेतृत्वात शेतकरी संघटना तालुका प्रमुख सुधाकर गायकी, लीलाधर गायकी, किसन अघाडे, श्याम गायकी, मंगेश साबळे, शशिकुमार ठाकरे, हरिभाऊ नवघरे, गजानन डोंगरे आणि निंभी येथील गावकर्यांचा या आंदोलनात सहभाग होता. आंदोलन स्थळी काही अनुचित प्रकार घडू नये म्हणून निंभीच्या पोलिस पाटील सविता राऊत, शिरखेडचे ठाणेदार सूरज तेलगोटे, दुय्यम ठाणेदार अनुप वाकडे, बीट जमादार विनोद मनोहरे, पोलिस कर्मचारी अजय अडगोकार, वैभव घोगरे, अमित राऊत, बिरोले यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.



# अक्षत कलश यात्रा रविवारी

## श्रीराम मंदिर गृहसंपर्क अभियान

**दि.३०विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** श्रीराम मंदिर गृहसंपर्क अभियान अमरावती महानगराच्यावतीने शुक्रवारी पत्रकार परिषद घेऊन ही माहिती देण्यात आली. यावेळी विहींपचे विभाग मंत्री बंटी पारवानी, विहींपचे महानगर प्रमुख दिनेश सिंह, अभियान संयोजक चेतन वाटणकर, सहप्रमुख योगेश गुल्हाने, प्रचार व प्रसार प्रमुख राहुल गुल्हाने, महानगर सहकार्यवाह आनंद पांडे यावेळी उपस्थित होते. मेरी वस्ती, मेरी अयोध्या या संकल्पनेतून महानगर व जिल्ह्यात २२ जानेवारीला विविध धार्मिक कार्यक्रम घेण्यात येणार आहे.जवळपास सर्वच मंदिरात सामूहिक पूजन होईल, सुंदरकांड, हनुमान चालीसा पठण होईल, शहरात ठिकठिकाणी प्राणप्रतिष्ठापणेचा सोहळ्याचे थेट प्रक्षेपण करण्यात येईल. याच दिवशी संध्याकाळी दिवाळी सारखा उत्सव साजरा करण्याचे आवाहन आम्ही संपर्क अभियानाच्या माध्यमातून करणार आहे. हिंदू समाजाने या सोहळ्यात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे. महानगरातल्या १ लाख कुटुंबापर्यंत पोहचण्याचे नियोजन आम्ही केले आहे. श्रीराम जन्मभूमि मंदिर ट्रस्टचे निवेदन, श्रीराम व मंदिराचा फोटो, अक्षत हे निमंत्रण देताना घरोघरी देण्यात येणार आहे. ३१ जानेवारीला अयोध्येतून आलेल्या अक्षत कलशाची यात्रा सायंकाळी ५ वाजता सतिधाम येथून निघेल. शहराच्या प्रमुख भागातून मार्गक्रमण करीत या यात्रेचा समारोप एकविरा देवी मंदिरात होईल. या यात्रेत भक्त मंडळींनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.



# जिल्हास्तरिय तंत्र प्रदर्शनीत विद्यार्थ्यांनी सादर केले नाविन्यपूर्ण आविष्कार

## अमरावती आय टी आय येथे भव्य आयोजन

**दि.३०विदर्भ प्रजासत्ताक अमरावती -** औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधून दिले जाणारे कौशल्ययुक्त प्रशिक्षण कारखान्यातील नवीन तंत्रज्ञानाच्या गरजेशी सुसंगत होण्यासाठी व कौशल्ययुक्त जागतिक दर्जाचे मनुष्यबळ निर्माण करण्यासाठी संपूर्ण महाराष्ट्रात व अमरावती विभागात नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येत आहे.यासोबतच देशातील औद्योगिक विकासाला गती प्राप्त व्हावी,औद्योगिक उत्पादन वाढावे,त्याला उत्तेजन मिळावे व साहाय्य व्हावे या हेतूने गुरुवार दि.२८ डिसेंबर २०२३ रोजी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था,अमरावती येथे जिल्हास्तरीय तंत्र प्रदर्शनीचे भव्य आयोजन करण्यात आले होते त्याचे उदघाटन अमरावती व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण विभागाचे सह-संचालक- प्रदीप घुले यांच्या हस्ते संपन्न झाले. या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून अमरावती आय एम सी संचालक सौं रंजना बिडकर,जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, डॉ. राजेश शेळके, राजेश चुलेट संस्थेचे उपसंचालक संजय बोरकर आदी मान्यवर उपस्थित होते.

या जिल्हास्तरीय तंत्र प्रदर्शनी मध्ये आपल्या अंगीभूत मूलभूत कौशल्याच्या बळावर त्या कौशल्यांचा दैनंदिन जीवनात करता येणारा उपयोग तसेच आवश्यकतेनुसार सदर आपल्या कौशल्याचे प्रदर्शन करीत यावेळी प्रशिक्षणार्थींनी साकारलेल्या मॉडेल्स ला बघण्याकरिता या तंत्र प्रदर्शनीला शेकडो विद्यार्थी व पालकांनी गर्दी केली होती. या जिल्हा तंत्र प्रदर्शनीत तज्ञांनी एकूण सात उत्कृष्ट मॉडेल्सची योग्य परिमाणानुसार निवड केली.अभियांत्रिकी गटातून शेतकरी मित्र हे उत्कृष्ट मॉडेल्स नांदगाव खंडेश्वर आय टी आय ने तयार करून प्रथम क्रमांक प्राप्त केला तर दुसरा क्रमांक वाढोणा खाजगी आय टी आय ने टेसला कॉईल हे मॉडेल तर तिसरा क्रमांक अमरावती आय टी आय ने तयार केलेल्या कार्बन प्युरिफिकेशन फॉर फॅक्ट्री अँड इंडस्ट्री या मॉडेल्स ने पटकावीला.विशेष उत्तेजनार्थ गटात मुलींच्या आय टी आय ने तयार केलेल्या होम असिस्टंट आटोमेशन या मॉडेल्स ला तर भातकुली आय टी आयच्या प्रशिक्षणार्थ्यांनी तयार केलेल्या इजी वॉकिंग ऍटोमॅटिक ब्रिज या मॉडेल ला गुणांकन दिले आहे. तर बिगर अभियंत्रिकी विभागातून विद्याभारती आय टी आय ने प्रस्तुत केलेल्या आय ओ टी बेस स्मार्ट हेल्थ केअर सिस्टीम या मॉडेलसला प्रथम तर दुसऱ्या क्रमांकावर मोर्शी आय टी आयच्या ट्रेडिशनल येंशीएन्ट आर्ट या मॉडेल्स ची निवड करण्यात आली.या तंत्र प्रदर्शनीचा निकाल गटनिदेशक संजय बोरोडे यांनी जाहीर केला. उत्कृष्ट मॉडेल्स चे बक्षीस वितरण संस्थेचे उप संचालक संजय बोरकर यांचे हस्ते संपन्न झाले.यावेळी डॉ. राजेश शेळके, प्रा. मंगेश गुडधे, शैलेश आचार्य, विकास ठाकूर, तुषार विल्हेकर, हिमांशू खाडे उपस्थित होते. ही तंत्रप्रदर्शनी यशस्वी करण्यासाठी संस्थेचे अधिकारी, गटनिदेशक, शिल्पनिदेशक, कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.



# २०४७ पर्यंत अयोध्या होणार जागतिक आध्यात्मिक राजधानी

## ३५ हजार कोटी खर्चून होतोय मेकओव्हर

**दि.३०विदर्भ प्रजासत्ताक अयोध्या :** –अयोध्यानगरी आणि आसपासच्या परिसरात सध्या प्रचंड पायाभूत सुविधांची उभारणी केली जात असून, जगभरातील पर्यटक यापुढे लाखोंच्या संख्येने नित्यनेमाने येत राहणार हे लक्षात घेऊन ३५ हजार कोटी रुपये खर्चाचा मेकओव्हर प्लॅन तयार करण्यात आला आहे. त्याची प्रभावी अंमलबजावणी योगी सरकारने सुरू केली आहे. या शिवाय, सन २०४७ पर्यंत अयोध्येला जागतिक आध्यात्मिक राजधानी बनविण्याचे लक्ष्य निश्चित करण्यात आले आहे.

भव्यदिव्य राम मंदिराचे कोट्यवधी हिंदूंचे स्वप्न साकारत असतानाच दुसरीकडे त्या निमित्ताने उत्तर प्रदेशच्या अर्थव्यवस्थेला जबरदस्त बळकटी देईल, असा विकासाचा 'अयोध्या ब्रॅण्ड'ही आकार घेत असल्याचे दिसत आहे. आयएएस अधिकारी असलेले प्राधिकरणाचे उपाध्यक्ष विशाल सिंग यांच्या कार्यालयाने याबाबतची माहिती दिली.

गुप्तार घाट ही एक अनोखी जागा आहे. शरयू नदीच्या तिरावरील या घाटावर प्रभू श्री राम यांनी वैकुंठ गमनापूर्वीची शेवटचे स्नान केले होते. त्यामुळे हा घाट अतिशय पवित्र मानला जातो. तेथे मोठ्या प्रमाणात सुविधा निर्माण केल्या जात आहेत. राम पथ, भक्ती पथ आणि राम जन्मभूमी मार्गासह ३० किलोमीटर लांबीच्या दर्शनी भागात सुधारणा करण्यात येत आहेत. सर्व घरे, दुकानांचा सारखाच रंग, त्यावर राम मंदिराची कमान, प्रभू रामाची विविध रुपे असलेली चित्रे साकारण्यात येत आहे.

धर्माला अध्यात्माची जोड देत अयोध्या जागतिक केंद्र व्हावे आणि भारतीय जीवनशैली, तत्त्वज्ञान व धार्मिकतेचा संगम साधत त्यांचा प्रचार-प्रसार करण्यासाठीच्या आवश्यक सोयीसुविधांची उभारणी अयोध्येत केली जात आहे. दर्शननगर भागातील सूर्यकुंड हे सूर्यवंशी शासकांनी सूर्याची आराधना करण्यासाठी बांधले होते. सूर्यकुंडाचा परिसर आता सुसज्ज करण्यात येत आहे. साउंड एड लाइट शोद्वारे सूर्यकुंडाचा इतिहास विदित केला जाईल. आजूबाजूला भरपूर पार्किंग व्यवस्था, फूडकोर्ट, ओपन जिम, स्वच्छतागृहांची उभारणी करण्यात येत आहे. अशा नागरी सुविधा संपूर्ण शहर व परिसरातही उभारल्या जात आहेत. रस्त्यांचे रुंदीकरण, उड्डाणपुलांची उभारणी जागोजागी होत आहे. त्यामुळे अरुंद गल्लीबोळांचे आणि अत्यंत गैरसोयींचे शहर ही अयोध्येची नकोशी ओळख पुसली जाणार आहे.



### नेमकी कशी बदलतेय अयोध्यानगरी?

अयोध्या नगरीत २५ ठिकाणी ९ मीटर उंचीचे श्री राम स्तंभ उभारण्यात येणार आहेत. 'राम की पैडी' म्हणजे शरयू नदीवरील घाटांची मालिका. प्रभू श्री राम शरयू नदीवर स्नानासाठी या मार्गानेच जात असे मानले जाते. या ठिकाणी लता मंगेशकर स्मृती चौक उभारला आहे. लतादीदींनी गायलेली प्रभू रामाची महती सांगणारी भजने येथे ऐकायला मिळतात. शरयू नदीच्या मध्यात पंचवटी द्विपाची उभारणी केली जात आहे. तिथे विविध प्रकारच्या धार्मिक, मनोरंजनात्मक, सांस्कृतिक कार्यक्रम होतील. शरयूच्या तिरावर पॅराग्लायडिंग, जेट-स्की, हॉट एअर बलून असे साहसी खेळ असतील. ३२ हेक्टर परिसरात ग्रीन फिल्ड वेदिक सिटीची उभारणी केली जाणार आहे. देशविदेशातील उच्चभ्रू लोकांसाठी वेगळा झोन असेल. चौधरी चरणसिंग घाटालगत त्यासाठी अयोध्या हाट उभारले जात आहे. तिथे निसर्गरम्य वातावरणातील महागडी निवासस्थाने, अलिशान हॉटेल्स आणि करमणुकीसाठीची साधने असतील.

## अंगणवाडी सेविकांनी केली राज्य आयुक्तांच्या आदेशाची होळी

**दि.३०विदर्भ प्रजासत्ताक तिवसा :** – स्थानिक बाल विकासप्रकल्प कार्यालयासमोर शुक्रवारी अंगणवाडी, बालवाडी कर्मचारी युनियन आयटकच्या वतीने तालुक्यातील अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्याकरिता एकात्मिक बाल विकास योजना विभागाच्या आयुक्तांनी काढलेल्या आदेशाची होळी करीत शुक्रवारी आंदोलन केले. सरकार बेपत्ता असल्याची जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. विविध मागण्या घेऊन गेल्या महिनाभरापासून जिल्ह्यातील अंगणवाडी सेविका, मदतनीस यांनी बेमुदत संप पुकारला आहे. शासनाकडून कुठलीही दखल घेण्यात आली नाही. याउलट एकात्मिक बाल विकास विभागाचे राज्याचे आयुक्त रुबेल अग्रवाल यांनी अंगणवाडी संप कालावधीत कुठलाही लाभार्थी आहारापासून वंचित राहू नये, याकरिता आहार पुरवठ्याची व्यवस्था तसेच सर्व अंगणवाडी सेविका, मदतनीस यांनी तातडीने कामावर रुजू होण्याचे आदेश काढले. या आदेशाला न जुमानता जोपर्यंत आमच्या न्यायाच्या मागण्या मान्य होणार नाही, तोपर्यंत कामावर रुजू होणार नसल्याचा निर्धार करीत या आदेशाची होळी करण्यात आली.

याप्रसंगी तालुकाध्यक्ष उषा गेडाम, सचिव वंदना बुटले,ममता कठाणे, योगीता वानखडे, संगीता मानमोडे, रजनी बेलसरे, वेणू राऊत, लता पारवे, वनमाला राऊत, हेमलता कुलकर्णी, पंचफुला चव्हाण, उषा पांडे, शालिनी खाकसे, अर्चना भुरे, प्रतिभा डिवरे यांच्यासह अंगणवाडी सेविका, मदतनीस मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.



महिनाभरापासून आम्ही मागण्यांसाठी लढत आहोत. आमच्या आंदोलनाला आशा वर्कर कर्मचारी, पर्यवेक्षिका, सरपंच संघटना यांचा पाठिंबा आहे. शासनाने आमच्या रास्त मागण्या पूर्ण करून न्याय द्यावा,

– वंदना बुटले,
तालुका सचिव, आयटक

## विद्यापिठात कुलगुरू पदासाठी ११ व १२ जानेवारीला होणार मुलाखती

**दि.३०विदर्भ प्रजासत्ताक अमरावती :** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या नवव्या कुलगुरूपदाच्या नियुक्तीसाठी 'राजस्थान पॅटर्न' लागू होणार असल्याची विश्वसनीय माहिती आहे. नागपूरकर 'परिवारा'तून नवे कुलगुरू असतील. त्यानुसार निवड समितीने वेग घेतला असून ४३ जणांची 'शॉर्ट लिस्ट' तयार केली आहे. कुलगुरूपदासाठी पात्र उमेदवारांना ११ व १२ जानेवारी रोजी मुलाखतीसाठी मेल धडकले आहेत. मात्र जे कुलगुरूपदाचे स्वप्न उराशी बाळगून होते, अशा उमेदवारांना मुलाखतींचे मेल न मिळाल्याने त्यांची अस्वस्थता वाढली आहे.

### चार सदस्यीय समिती घेणार उमेदवारांच्या मुलाखती

अमरावती विद्यापीठाच्या नवीन कुलगुरू निवडीसाठी चार सदस्यीय समितीचे गठन केले आहे. त्यात अध्यक्षपदी कानपूर येथील – आयआयटीचे डॉ. संजय धांडे, तर सदस्य म्हणून सुरत येथील एसव्हीएनआयटीचे डॉ. अनुपम शुक्ला, लखनों विद्यापीठाचे डॉ. मनोज दौक्षित, तर नोडल अधिकारी म्हणून न पुणे येथील शासकीय अभियांत्रिकीचे न डॉ. सुजित परदेशी यांचा समावेश र आहे. ही समिती कुलगुरूपदासांठी पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या ११ आणि १२ जानेवारी २०२४ रोजी मुलाखती घेणार आहेत.

विद्यापीठाचे कुलगुरू पदासाठी एकूण ११५ पैकी ७२ उमेदवारांचे अर्ज बाद ठरविण्यात आले होते. आता ४३ पात्र उमेदवारांची 'शॉर्ट लिस्ट' तयार करण्यात आली आहे. त्यांना मुलाखतीचे मेल पाठविण्यात आले आहे. राज्य शासनाने नेमलेल्या कुलगुरू निवड समितीची रविवार, २४ डिसेंबर रोजी बैठक आटोपली. आता समितीकडून पात्र उमेदवारांना मुलाखतीचे मेल पाठविण्यात आले आहे. मात्र नुकतेच राजस्थान येथे सत्ता

स्थापन करताना जे धक्कातंत्र वापरले, तोच पॅटर्न अमरावती विद्यापीठाच्या कुलगुरू नियुक्तीसाठी वापरले जाईल, असे संकेत मिळू लागले आहेत. नागपूरकर 'मिलिंद यांच्या 'बाराहाती' नव्या कुलगुरूपदाची सूत्रे सोपविली जातील, हे जानेवारी २०२४ मध्ये स्पष्ट होणार आहे. त्याबाबत शैक्षणिक वर्तुळात मोठे चर्वितचर्वण केले जात आहे.




## अंजनगाव बारी बिटस्तरीय शालेय क्रीडा महोत्सव उत्साहात साजरा

### तिनशे खेळाडूंचा सहभाग



### चिमुकल्यांच्या सांस्कृतिक कार्यक्रमाने प्रेक्षकांना रिझविले

**दि३० विदर्भ प्रजासत्ताक अमरावती,** प्राथमिक शालेय क्रीडा महोत्सवाअंतर्गत अंजनगाव बारी बिटस्तरीय क्रीडा महोत्सव भानखेडा बु. येथील शिवाजी हायस्कूल मध्ये उत्साहात झाला. या महोत्सवात सुमारे तिनशे खेळाडू व खेळ शिक्षक यांनी सहभाग नोंदविला. यावेळी चिमुकल्यांच्या सांस्कृतिक कार्यक्रमाने प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. या क्रीडा महोत्सवाचे उदघाटन गटशिक्षणाधिकारी धनंजय वानखडे यांच्या हस्ते महापुरुषांच्या प्रतिमेला हारार्पण व दीपप्रज्वलन करून करण्यात आले. यावेळी त्यांनी क्रीडाध्वज व क्रीडाज्योत प्रज्वलित केली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपसरपंच नारायणराव महिंगे हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून शाळा व्यवस्थापन समिती चे अध्यक्ष प्रमोद शेंदरे, शिक्षण विस्तार अधिकारी अजित पाटील, क्रीडा संयोजक संदीप बोडखे, अनिल डाखोरे, सुरेंद्र मेटे,मुख्याध्यापक विलास ठाकरे, प्रकाश ठाकरे, शिला धवणे आदी उपस्थित होते. बिटस्तरीय क्रीडा महोत्सवात अंजनगाव बारी परिक्षेत्रातील मलकापूर, सुकळी, बोरगाव धर्माळे व अंजनगाव केंद्रातील सुमारे तिनशे खेळाडू व खेळ शिक्षक सहभागी झाले होते. यावेळी सांघिक व वैयक्तिक खेळ घेण्यात आले. यावेळी चिमुकल्यांच्या सांस्कृतिक कार्यक्रमाने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. विजयी व उपविजयी चमू तालुकास्तरीय क्रीडा महोत्सवात सहभागी होणार आहे. कार्यक्रमाला केंद्रप्रमुख सुधीर भोळे, प्रशांत मुंद्रे, स्मृती बाबरेकर, विलास बाबरे, महावीर वानखडे, मनोज कावरे, चंद्रकांत कुरळकर, तिमय्या तेलंग, डॉ. मोहोड, अनिल सरदार, गजानन घराड, निलेश चव्हाण, विनायक लकडे, वैशाली घराड, सुजाता रामटेके, वैशाली माहुलकर यांच्यासह मुख्याध्यापक व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीसाठी श्रीकृष्ण मंडळाचे विशाल सलामे, कुणाल नेवारे, गौरव नेवारे, तन्मय टेकाम, संकेत कोकाटे, साहिल नेवारे, हर्ष कोकाटे, करण इंदोरे, तुषार सलामे, ओम मेश्राम, मंजुळा नेवारे, वैशाली कोहरे, संगीता स्वर्ग, नागाबाई मेश्राम आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक क्रीडा संयोजक संदीप बोडखे यांनी केले. संचालन नम्रता रामटेके यांनी तर आभार विलास बाबरे यांनी मानले.

## राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव १२ जानेवारीपासून

### २२ विद्यापीठांचे सुमारे २४०० विद्यार्थी सहभागी होणार : कुलगुरूंनी घेतला आढावा

**दि.३०विदर्भ प्रजासत्ताक नागपूर:** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव १२ ते १६ जानेवारी २०२४ दरम्यान होणार आहे. विद्यापीठ क्रीडा संकुल परिसरात आयोजित या क्रीडा महोत्सवात महाराष्ट्रातील २२ विद्यापीठांचे सुमारे २४०० विद्यार्थी सहभागी होणार आहेत. या क्रीडा स्पर्धेत थलेटिक्स, बॅटमिंटन, टेबल टेनिस, बास्केटबॉल, व्हॉलीबॉल आदी खेळांचे मुले व मुलींच्या संघांचे सामने होतील.

महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या यजमानाखाली होणार आहे. राज्य क्रीडा महोत्सव जवळ येत असल्याने विद्यापीठाच्या क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाकडून जोरदार तयारी सुरू आहे. शुक्रवारी कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी स्पर्धा नियोजित असलेल्या परिसरातील विविध कामांची पाहणी केली. स्पर्धा परिसरात नव्याने पार्किंग व्यवस्था तयार करणे. नवीन कॅफ्रेट एरिया उभारणे.

परिसराची रंगरंगोटी करणे. कायमस्वरूपी नवीन ३ प्रवेशद्वाराची निर्मिती करणे. परिसर सौंदर्यकरण त्याचप्रमाणे बास्केटबॉल कोर्टची रंगरंगोटी करणे आदी महत्त्वपूर्ण सूचना कुलगुरूंनी यावेळी संबंधित विभागाला दिल्या. मैदानी खेळ परिसरात विविध सुविधा निर्माण करीत या भागात विद्युत रोषणाई करण्याच्या सूचना कुलगुरूंनी दिल्या. स्पर्धा परिसरात सुसज्ज असा वैद्यकीय कक्ष उभारण्याबाबत सूचना दिल्या.

यावेळी क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग संचालक डॉ. शरद सूर्यवंशी, विद्यापीठ अभियंता नितीन विश्वकार, उद्यान अधीक्षक प्रवीण गोतमारे, उपअभियंता महेंद्र पाटील, डॉ. आदित्य सोनी, डॉ. नितीन जांगीटवार, डॉ. मनोज आंबटकर, राजेंद्र बालपांडे यांच्यासह अन्य उपस्थित होते.



## कारागृहात पहिल्या दिवशीची रात्र काढली जागुन

**दि.३०विदर्भ प्रजासत्ताक नागपूर :**ऐशो आरामात जीवन जगण्याची सवय असलेले माजी मंत्री सुनील केदार यांनी न्यायालयाने शिक्षा सुनावल्यानंतर कारागृहाच्या भेसूर आणि गडद वातावरणात गुरुवारची रात्र जागून काढली. सायरन वाजविणाऱ्या पोलिसांच्या गाड्यांच्या मध्ये आलिशान गाडीत प्रवास, मागेपुढे कार्यकर्त्यांचा लवाजमा, चमचमीत लज्जतदार जेवण आणि फाईव्ह स्टार रूम मधील मुक्कामाची सवय असलेल्या माजी मंत्री सुनील केदार यांना न्यायालयाने बँकेतील घोटाळा प्रकरणी दोषी ठरवून पाच वर्ष कारावास आणि१२ लाख ५० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. शिक्षा सुनावल्यानंतर केदार यांची प्रकृती बिघडल्यामुळे त्यांना मेडिकलमध्ये दाखल करण्यात आले होते. तेथे त्यांच्यावर उपचार केल्यानंतर गुरुवारी डॉक्टरांनी केदार फिजिकली फिट असल्याचे प्रमाणपत्र पोलीस प्रशासनाला दिले. त्यानंतर गुरुवारी रात्री पोलिसांनी केदार यांची रवानगी येथील मध्यवर्ती कारागृहात केली.या पार्श्वभूमीवर, केदार गुरुवारी रात्री मध्यवर्ती कारागृहात पोहोचले. मुख्य प्रवेशद्वारातून आत मध्ये घेतल्यानंतर त्यांना



कारागृहातील कपडे तसेच ब्लँकेट चादर आणि दरी देण्यात आली. केदार यांच्या प्रकरणावर सर्वत्र नजर ठेवून असल्यामुळे कारागृह प्रशासनाने कोणत्याही प्रकारची रिक्स घेण्याचे टाळले आहे. त्यांना आज सकाळपासून रीतसरपणे कारागृहात दिला जाणारा चहा नाश्ता त्यानंतर सकाळी ११ वाजता आणि सायंकाळी ६ वाजता मसूरची डाळ, वांग्याची भाजी, भात आणि पोळ्या असे जेवण देण्यात आले.

केदार यांना व्हीआयपी किंवा स्पेशल ट्रीटमेंट दिल्या जात असल्याचा आरोप किंवा आरडाओरड होऊ नये म्हणून कारागृह प्रशासनाने त्यांना ओपन बऱ्याकमध्ये ठेवले आहे. मध्यवर्ती कारागृहातील ओपन बऱ्याक मध्ये रोज साडेचारशे ते पाचशे बंदिवान असतात. दिवसा ठीक मात्र रात्री त्यांना इकडून तिकडे व्हायलाही जागा नसते. अगदी बाथरूमलाही जायचे असले तर हात वर करून प्रत्येकाला अनुक्रमांकानुसार बऱ्याक च्या बाहेर काढले जाते.

## वनखात्याच्या विश्रामगृहात आग, व्हीआयपी कक्ष जळून खाक

**दि.३०विदर्भ प्रजासत्ताक नागपूर :** वनविभागाच्या सेमिनरी हिल्सवरील विश्रामगृहात शॉर्टसर्कीटमुळे लागलेल्या आगीत तळमजल्यावरील व्हीआयपी कक्ष जळून खाक झाले. दरम्यान, ही आग विझवण्यासाठी गेलेल्या विश्रामगृहाच्या कर्मचाऱ्याचा जीव गुदमरल्यामुळे त्याला रुग्णालयात भरती करण्यात आले.

सेमिनरी हिल्सवर हरिसिंग सभागृहाच्या पाठीमागे असलेल्या रोपवाटिकेजवळ वनविभागाचे विश्रामगृह आहे. नुकत्याच आटोपलेल्या हिवाळी अधिवेशनादरम्यान वनखात्याचे मंत्रालयातील सर्व अधिकारी या विश्रामगृहात मुक्कामी होते. ते परतून आठवडा होत नाही तोच या विश्रामगृहात शॉर्टसर्किट झाल्याने वनविभागाच्या व्यवस्थापनावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. हे क्षेत्र एका महिला वनपरिक्षेत्र अधिकाऱ्याकडे आहे. याच परिसरातील ट्रान्झिट ट्रिटमेंट केंद्रातही अशी घटना होता होता टळली. यात एका कर्मचाऱ्याला विद्युत प्रवाहाचा झटका लागला.

मात्र तो थोडक्यात बचावला. त्यानंतर वीज मंडळाच्या कर्मचाऱ्यांनी येथील संपूर्ण विद्युत यंत्रणा बदलण्यास सांगितले होते. या घटनेला दीड महिना झाला, पण अजूनही या महिला वनपरिक्षेत्र अधिकाऱ्याने यासंदर्भात कोणतेही पाऊल उचललेले नाही.दरम्यान, शुक्रवारी सायंकाळी उशिरा जवळच्याच विश्रामगृहात ही घटना घडली. याठिकाणीसुद्धा विद्युत यंत्रणेत बिघाड झाला असण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळेच शॉर्टसर्किट होऊन दहा क्रमांकाचा व्हीआयपी कक्ष जळून खाक झाला. यासंदर्भात प्रादेशिक वनविभागाच्या वनसंरक्षक श्रीलक्ष्मी यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी शनिवारी या संपूर्ण प्रकरणाची तपासणी करण्यात येईल असे सांगितले. रात्र झाल्यामुळे आता कोणताही तपास करणे अशक्य आहे. त्यामुळे शनिवारी सकाळी तपासानंतरच शॉर्टसर्कीटमागे नेमके कारण काय, हे कळेल असे त्यांनी सांगितले.

# उद्याला विदर्भ संस्कार भारती आयोजित डॉ.कल्पना व्यवहारे स्मृती वायय पुरस्कार वितरण समारंभ







**दि.३०विद्र्तभ प्रजासत्ताक अमरवती**

रंगमंच व ललित कलांच्या संवर्धनार्थ कार्यरत विदर्भ संस्कार भारतीच्या वतीने वाययक्षेत्रातील उल्लेखनीय साहित्यकृती,दरवर्षी प्रा.डॉ.कल्पना व्यवहारे स्मृती पुरस्काराने सन्मानित केल्या जातात.यावर्षी गत दोन वर्षाचे हे पुरस्कार विभागून देण्यात येणार आहेत.हा पुरस्कार वितरण सोहळा रविवार दि. ३१ डिसेंबर रोजी श्री समर्थ विद्यालय सभागृह , बडनेरा रोड,अमरावती येथे सायंकाळी ठीक पाच वाजता आयोजित केला आहे.पुणे येथील सुप्रसिद्ध लेखक,चिंतक व समाजसेवक पद्मश्री गिरीश प्रभुणे यांचे शुभहस्ते वायय पुरस्कार दिले जाणार आहेत.या समारंभास सौ.कांचन गडकरी , अध्यक्ष संस्कार भारती नागपूर महानगर यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.विदर्भ संस्कार भारतीच्या अध्यक्ष सुरमणी कमलताई भोंडे या कार्यक्रमाच्या अध्यक्ष राहतील.या कार्यक्रमात डॉ. श्यामा घोणसे,पुणे ( भारतीय संत आणि सामाजिक समरसता),श्री दत्ता जोशी,छत्रपती संभाजी नगर (तुम्ही बी घडा ना) डॉ.राजेंद्र नाईकवाडे,नागपूर (शब्दनिष्ठांची मांदीयाळी) श्री किरण डोंगरदिवे, मेहकर (काव्यप्रदेशातील स्त्री) यांना त्यांच्या साहित्यकृती करीता पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.या पुरस्कार सोहळ्यास एक साहित्य रसिक नि कला रसिक म्हणून आपण अवश्य उपस्थित राहावे असे आवाहन डॉ. जयश्री वैष्णव,अध्यक्ष व आशुतोष देशपांडे,मंत्री संस्कार भारती अमरावती महानगर यांच्या वतीने करण्यात येत आहे.या कार्यक्रमातील आपल्या नुसत्या उपस्थितीनेही सकस वायय निर्मितीस बळच प्राप्त होईल.

# मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा उपक्रम

## जास्तीत जास्त शाळांनी उपक्रमात सहभाग घ्यावा : अविश्यांत पंडा

**दि.३०विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

सर्व व्यवस्थापनांच्या व सर्व माध्यमांच्या शाळांमधील शिक्षक ,पालक, विद्यार्थी व माजी विद्यार्थी यांच्यात स्पर्धात्मक वातावरणातून विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी आनंददायी व प्रेरणादायी वातावरण मिळावे , यासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेंतर्गत 'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' हे अभियान राबविण्याचे निर्देश शासनाकडून प्राप्त आहेत. हे अभियान दि. १ जानेवारी ते १५ फेब्रुवारी २०२४ या कालावधीत राबविल्या जाणार आहे. जिल्ह्यातील जास्तीत – जास्त शाळांनी या उपक्रमात सहभाग घेण्याच आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अविश्यांत पंडा यांनी आज येथे केले आहे.



या उपक्रमाच्या अंमलबजावणीबाबत कार्यवाहीचा आढावा जिल्हा परिषदेच्या सभागृहामध्ये श्री. अविश्यांत पंडा यांच्याकडून घेण्यात आला. गट शिक्षणाधिकारी यांनी तालुकानिहाय मुख्याध्यापकांच्या सभा घेऊन त्यांना या अभियानात सहभागी होण्याबाबत सूचित करण्यात आले.

अभियानाचे कालबद्ध नियोजन करुन हे अभियान यशस्वी करावे. जिल्ह्यातील सर्व शाळांनी या अभियानामध्ये सहभाग घेऊन जिल्ह्यामध्ये जास्तीत जास्त प्राविण्य मिळवावे. या अभियानामध्ये सहभागी शाळांच्या कामागिरीच्या आधारे मुल्यांकन करण्यात येऊन त्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्र वर्ग अ व ब च्या महानगरपालिकेचे कार्यक्षेत्र व उर्वरित महाराष्ट्र कार्यक्षेत्र या गटांमध्ये मुल्यांकन करण्यात येणार आहे.

अमरावती जिल्हा उर्वरित महाराष्ट्र कार्यक्षेत्रामध्ये मोडत असून या अंतर्गत तालुका, जिल्हा, विभागस्तर व राज्यस्तरावर शाळांचे मुल्यांकन होणार आहे. या अभियानामध्ये स्थानिक स्वराज्य संस्था व इतर व्यवस्थापनांच्या शाळा अशा दोन वर्गवारीतून शाळांची निवड होणार आहे.

दोन्ही वर्गवारीतून तालुकास्तरावर पहिले बक्षिस ३ लक्ष रुपये, दुसरे बक्षिस २ लक्ष रुपये व तिसरे बक्षिस १ लक्ष रुपये असे आहेत. जिल्हास्तरावर पहिले बक्षिस ११ लक्ष रुपये, दुसरे बक्षिस ५ लक्ष रुपये व तिसरे बक्षिस ३ लक्ष रुपये असून विभागस्तरावर पहिले बक्षिस २१ लक्ष रुपये , दुसरे बक्षिस ११ लक्ष रुपये व तिसरे बक्षिस ७ लक्ष रुपये या प्रमाणे देण्यात येणार आहे. राज्यस्तरावर पहिल्या बक्षिसांची रक्कम ही ५१ लक्ष रुपये असून दुसरे बक्षिस २१ लक्ष रुपये व तिसऱ्या बक्षिसांची रक्कम ११ लक्ष रुपये अशी आहे.

जिल्ह्यातील सर्व शाळांनी या अभियानात सहभागी होण्याच्या दृष्टीने तयारी सुरु केली असून जास्तीत –जास्त बक्षिसे मिळविण्याचा शाळांचा प्रयत्न आहे असे जिल्हा परिषद शिक्षणाधिकारी प्रफुल्ल कचवे यांनी सांगितले.

# थर्टी फस्ट, १ जानेवारी चिखलदरा रोड राहणार वन वे : चिखलदरा रोड अरुंद व घाट असल्याने जिल्हा प्रशासनाचा निर्णय



**दि.३०विदर्भ प्रजासत्ताक चिखलदरा**

विदर्भाचे नंदनवन असणाऱ्या चिखलदरा येथे पावसाळी पर्यटनासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी होते. शनिवारी व रविवारी पर्यटकांची तेथे गर्दी असते. ही बाब लक्षात घेऊन अप्पर जिल्हाधिकाऱ्यांनी चिखलदरा पर्यटनस्थळी ३१ डिसेंबर आणि १ जानेवारी २०२४ रोजी वाहतूक एक मार्गी करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यामुळे परतवाडा ते धामणगांव मार्गे चिखलदरा हा रस्ता येण्याकरीता एक मार्गी (वन-वे) तसेच चिखलदरा ते घटांग मार्गे परतवाडा जावे लागणार आहे. चिखलदरा हे पर्यटनस्थळ असून आजूबाजूचे जिल्हयातील तसेच इतर ठिकाणावरुन नविन वर्षानिमित्त पर्यटक चिखलदरा येथे येत असतात. परतवाडा ते चिखलदरा रोड हा अरुंद व घाट वळणाचा असल्याने अपघात होण्याची शक्यता असते.त्यामुळे ३१ डिसेंबर २०२०३ ते ०१ जानेवारी २०२४ या कालावधीत परतवाडा वरुन चिखलदराकडे जाणारी वाहतुकहीपरतवाडा वरुन धामणगांव मार्गे चिखलदरा तसेच चिखलदरावरुन परतवाडा परत येणारी वाहतूक ही चिखलदरा वरुन घटांग मार्गेपरतवाडा या पध्दतीने वन–वे पध्दतीने वळविण्याचा प्रस्ताव पोलीस अधिक्षक, अमरावती ग्रामीण यांनी केला. त्यानुसार जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी ३१ डिसेंबर २०२३ ते १ जाने. २०२४ या कालावधीमध्ये परतवाडा वरुन चिखलदराकडे जाणारी वाहतूकही परतवाडा वरुन धामणगांव मार्गे चिखलदरा तसेच चिखलदरावरुन परतवाडा कडे परत येणारी वाहतुक ही चिखलदरा वरुन घटांग मार्गे परतवाडा या एकमार्गी (वन-वे) पध्दतीने वळविण्याबाबत आदेश निर्गमित केले आहे.

# राममंदिर अक्षता कलश यात्रेच चांदुरबाजार मध्ये आयोजन

## नवीन वर्षाच्या पहिल्या दिवशी, तालुक्यातील हजारो भक्त होणार सहभाग

**दि.३०विदर्भ प्रजासत्ताक चांदुर बाजार**




चांदूर बाजार शहरात नवीन वर्षाच्या पहिल्या दिवशी सकल हिंदू संघटनेच्या वतीने दिनांक १ जानेवारी २०२४ रोजी श्रीराम मंदिर अयोध्ये मधून आलेल्या अक्षत मंगल कलश यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे जानेवारीची उत्कंठा लागली असून २२ जानेवारी रोजी प्रभू श्री रामचंद्र हे आयोध्येच्या मंदिरात विराजमान होणार आहेत देशभरात दिवाळीसारखा सण मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे या पार्श्र्वभूमीवर श्रीराम मंदिर अक्षता कलश यात्रेचे जिल्ह्यात ठिकठिकाणी जल्लोषात स्वागत करण्यात आले तर त्याच शुभपर्वावर चांदुर बाजार मध्ये अयोध्ये मधून आलेल्या अक्षता मंगल कलश यत्रेच भव्य आयोजन हिंदु संगठनाच्या वतीने करण्यात आले असून तालुक्यातील हजारो राम भक्त यात्रे साठी चांदुर बाजार बाजार मध्ये दाखल होणार असल्याची माहिती विश्र् हिंदू परिषद च्या पदाधिकाऱ्यांनी दिली आहे तर अक्षता कलश देऊन तालुक्यातील ९६ गावांमध्ये प्रत्येक घरात संपर्क साधुन अयोध्येतील श्रीराम मंदिरा साठी राम भक्ताना निमंत्रित करणार व यात्रे मध्ये हजारो च्या संखेत पुरुषांसह महिला सुद्धा सहभाग होणार चांदुर बाजार मधील श्रीराम मंदिर येथुन दुपारी अक्षता मंगल कलश यात्रेची सुरवात होणार असून नगर प्रदक्षिणा करणार तर अनेक वर्षांपासून चालत असलेली महाराष्ट्राची संस्कृति पालखी मध्ये अक्षता मंगल कलश ठेऊन वारकऱ्यांसह वाद्य वाजवून चांदूर बाजार शहरात भक्तीमय वातावरण करणार यासह प्रभू श्रीराम मातासीता,लक्ष्मण ,हनुमानजींची वेशभूषा राहणार असल्याची माहिती विश्व हिंदू परिषदेने दिली तर अक्षता मंगल कलश यात्रेमध्ये मोठ्या संकेत सहभागा होण्याच आव्हान देखील सकल हिंदू संघटनेच्या वतीने करण्यात् आले आहे.

**तालुक्यातील ९६ गावांमधील घरोघरी संपर्क साधणार**

श्रीराम जन्मभूमी आयोध्ये मधून आलेल्या अक्षता मंगल कलश चांदूर बाजार तालुक्यात ग्रामीण भागात ९६ गावांमध्ये जाणार असून प्रत्येक घरांमध्ये संपर्क साधून श्रीराम मंदिर प्रभू श्रीरामच्या मूर्ती प्राणप्रतिष्ठान साठी प्रत्येक घरी जाऊन राम भक्तांना निमंत्रित करणार आहे

# ६७ पैकी ५८ श्वानांना जीवदान, ९ श्वानांचा मृत्यू : प्राणीप्रेमी वसा संस्थेची कामगिरी



### किमोथेरपी ने वाचविले ५८ श्वानांचे प्राण

या वर्षी शहरभरातून वसा संस्थेच्या अनिमल्स रेस्क्यु टीमने किमोथेरपीतून ५८ श्वानांचे प्राण वाचविले. यामध्ये १८ नर तर ४९ मादी श्वानांचा समावेश होता. यामध्ये काही श्वानांना म्यामेरी ग्ल्यांड ट्युमर झाले होते, तर काही श्वानांना ट्रान्समर्सिबल वेनेरल ट्युमर झाला होता. श्री गोरक्षण व्हेटर्नरी हॉस्पिटलमध्ये डॉ. दीपक कऱ्हे आणि डॉ. सुमित वैद्य यांनी या श्वानांना किमोथेरपी दिली. वसा अनिमल रेस्क्यु सेंटरमध्ये त्यांची योग्य ती काळजी घेतली गेली. ट्युमर असलेल्या श्वांनाचे ऑपरेशन केले गेले.

### कर्करोग बरा करण्यासाठी केमोथेरपीच प्रभावी

कर्करोग बरा करण्यासाठी केमोथेरपी हा एकमेव प्रभावी उपचार आहे. रस्त्यावरून रेस्क्यू करून आणलेल्या कॅन्सर ग्रस्त श्वानांना दुय्यम संसर्गाची भीती असते. कर्करोगामुळे त्यांचे वजन कमी होते किंवा शरीरात रक्ताची कमतरता असते. अशा परिस्थितीत उपचारांपूर्वी त्यांना चांगले अन्न दिले जाते, नंतर त्यांचे रक्त तपासले जाते आणि त्यांच्यावर केमोथेरपी केली जाते. कर्करोगविरोधी औषधांमुळे काही श्वानांमध्ये केस गळणे आणि कमी खाणे अशी लक्षणे दिसतात.असे श्री गोरक्षण पशुवैद्यकीय रुग्णालयाचे वरिष्ठ पशुवैद्यकीय अधिकारी डॉ.दीपक कर्हे यांनी सांगितले.

**दि३०विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

जखमी प्राण्यांच्या वेदनांवर फुंकर मारणार्या वसा संस्थेच्या पदाधिकार्यांनी रेस्क्यू करून आणलेल्या ६७ श्वानांवर उपचार केलेत. परंतू किमोथेरपी दरम्यान ९ श्वानांचा मृत्यू झाला. तर इतर ५८ श्वानांना जीवदान मिळाले आहे. पूर्णपणे बरे झालेल्या या श्वानांना त्यांच्या मूळ जागी सोडून देण्यात आले आहे. या श्वानांवर किमोथेरपी सुरु करण्याआधी आणि नंतर त्यांच्या रक्ताच्या तपासण्या होतात, त्यानंतर त्यांच्या उपचाराच्या पद्धती ठरविल्या जातात असे वसाचे व्हेटर्नरी सर्जन डॉ. सुमित वैद्य यांनी सांगितले.

वसा संस्थेला जखमी प्राण्यांच्या मदत करिता दिवस भरातून ३० ते ४० रेस्क्यू कॉल्स येतात. यामध्ये प्रामुख्याने अपघात जखमी झालेले श्वान, मांजरी, गायी, म्हशी, डुक्कर, घोडे यांचा समावेश असतो. लहान प्राण्यांच्या वाहतूकीसाठी लहान रुग्णवाहिकेचीही व्यवस्था आहे. मात्र मोठ्या प्राण्यांच्या वाहतुकीचा मोठा प्रश्न आमच्या समोर आला आहे. सोबतच दररोज जखमी प्राण्यांच्या केसेस अमरावती शहरात वाढत आहेत. त्यामुळे या प्राण्यांना ठेवण्याच्या व्यवस्थेवर प्रभाव पडत आहे. वसा सेंटरवर आता एक्सरे मशीन, रक्त तपासणी मशीन आणि गॅस अनेस्थेशियाची सुविधा उपलब्ध आहे. प्राणी प्रेमी नागरिकांनी पुढाकार घेऊन या मुक्या जिवांसाठी मदत करणे अपेक्षीत आहे, अशी माहिती वसा संस्थेचे सचिव गणेश अकर्ते यांनी दिली.

# कपिल वस्तू नगरातील मुख्य रस्ता विद्रुप करण्याचा प्रकार हाणून पाडला

**दि.३०विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

अमरावती महानगर पालिका क्षेत्रातील कपिल वस्तू नगर येथील मुख्य रस्त्यावर अर्धवट कॉंक्रीटीकरण व थातुर मातुर बांधकाम करण्याचा प्रकार होत असतांना स्थानिक नागरिकांनी सजग राहून हा रस्ता विद्रुप करण्याचा प्रकार हाणून पाडला . यावेळी नागरिकांनी आक्रामक होऊन अर्धवट होत असलेले काम बंद पाडले. व बांधकाम जर करायचेच असेल तर पूर्ण मुख्य रस्त्याचे बांधकाम करा अशा पवित्रा घेतला.

### अर्धा रस्ता नाही तर पूर्ण रस्ता बांधण्याची केली मागणी



अमरावती महानगर पालिका जिल्हा नियोजन निधी २०२२-२३ मधून स्थानिक प्रभाग क्रमांक ६ विलास नगर –मोरबाग अंतर्गत कपिल वस्तू नगरातील एका गल्लीतील अंदाजे १० लक्ष निधीतून रस्ता व नालीचे कॉंक्रीट बांधकाम करण्यात आले. यातील काही निधी शिल्लक राहिल्याने संबंधित कंत्राटदाराने कपिल वस्तू नगरातील सर्व सहा गल्ल्यांना जोडणाऱ्या मुख्य रस्त्यावर मधातूनच कॉंक्रीट बांधकाम सुरु केले. रस्त्याच्या समोरचा आणि मागचा भाग सोडून देऊन हे बांधकाम मधातूनच अर्धवटपणे होत असल्याने रस्ता विद्रुप होणार होता. त्यामुळे स्थानिक नागरिकांनी आक्रमक होऊन या अभद्र बांधकामाला विरोध दर्शवून बांधकाम बंद पाडून विकास कामाच्या नावावर रास्ता विद्रुप करण्याचा प्रयत्न हाणून पाडला. या रस्त्याचे थातूर मातुर काम होत असतांना जागृत नागरीकांनी तो रस्ता पूर्ण बांधण्याची मागणी करून काम बंद पाडून आपल्या नगरातील एकतेचा परिचय दिला. सरकारच्या पैशाची उधळपट्टी करून काहीही अनियमित कामे कडून इकडला निधी तिकडे व तिकडले काम इकडे करण्याचा हा सर्रास प्रकार असून बिले काढून जनतेची दिशाभूल करण्याचा हा प्रयत्न असल्याचे यावरून निदर्शनास आल्याने नागरिकांनी संबंधित मनपा उपअभियंता ,तसेच कंत्राटदार यांच्या कामकाजावर तीव्र रोष व्यक्त केला. यावेळी जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते राहुल तायडे, रामू ठाकूर, सतीश खलाले, हॉकर्स युनियन गणेश मारोडकर, धीरज पानेकर, कुशल तायडे, जीवन कावरे, सुनील आरु, संतोष डहाके ,मिलिंद तायडे , ऋतिक बरडे , अक्षय लोखंडे , अक्षय सरदार , अनिकेत झीमटे, प्रकाश मारोटकर आदीसह स्थानिक कपिल वस्तू नगरातील सर्व युवक, महिला भगिनी व जेष्ठ नागरिक उपस्थित होते.

# महसुलमंत्र्यांच्या घोषणेमुळे उत्सुकता

## शिरजगाव कसबाला तालुक्याच्या दर्जाची प्रतीक्षा

**दि.३०विदर्भ प्रजासत्ताक शिरजगाव कसबा**

राज्याच्या मध्यप्रदेश सीमेवर असलेले व जिल्ह्यातील सर्वात मोठे असलेले शिरजगाव नवीन तालुका होणार की उपतालुका होणार हा विषय सध्या चर्चिला जात असून महसूल मंत्र्यांनी केलेल्या घोषणामुळे उत्सुकता निर्माण झाली आहे. याठिकाणी दर शनिवारला मोठा आठवडी चाजार होत असून १० गावाची बाजारपेठ आहे. मध्य प्रदेशचे ४ गावाची ही बाजारपेठ आहे. या ठिकाणीप्राथमिक स्वास्थ्य केंद्र, ३ विद्यालय, ३ जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, २ शेतकरी प्रोड्रूसर कंपनी, ३ राष्ट्रीयकृत बँका, १ सहकारी बँक, २ सहकारी पतसंस्था, १ पोस्ट ऑफिस, पोलीस स्टेशन व तालुक्याच्या ठिकाणी असणारे वनविभागाचे तालुका कार्यालय शिरजगावातच आहे. शिरसगाव तालुका करण्याबाबत १९९० ग्रामपंचायत ने शासन दरबारी ठराव पाठविले होते. तत्कालीन जिल्हाधिकारी शिवाजीराव पाटील यांनी शिरसगाव कसबा येथे ग्रामपंचायत कार्यालयबाजूला ग्रामपंचायत इमारत मध्ये उप तहसील कार्यालय सुरू केले होते, २ वर्षानंतर ते बंद झाले. २०१२ ला तत्कालीन कृषिमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनासुद्धा याबाबत निवेदन देण्यात आले होते, तेच आता महसूल मंत्री असल्याने शिरसगाव उप तालुका की तालुका याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे. मतदारसंघाचे व जिल्ह्याचे लोकप्रतिनिधी नी लक्ष दिल्यास शिरसगाव तालुका होणार व शिरसगाव चा तसेच आजूबाजूचे गावांचाही विकास होणार आहे.

# १ जानेवारीला सायन्सकोर येथे ऐतिहासिक,विश्वविक्रमी मानवंदना

## भीमा कोरेगाव शौर्य दिनानिमित्य भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन : विदेशातील पाहुण्यांचीही राहणार उपस्थिती

**दि.३० विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

१,२ आणि ३ जानेवारी २०२४ ला सायन्सस्कोर मैदान अमरावती येथे ऐतिहासिक विश्वविक्रमी मानवंदना कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यावर्षी कार्यक्रमाला विशेष आकर्षण म्हणून १८९८ च्या शौर्य गाथेच्या लढाईचे सरसेनापती सिध्दनाक महार यांचे १२ वे वंशज मिलींद इनामदार (कळंबी) मुख्य अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.अयोजनाचे हे बारावे वर्ष असून ५० बुलेटवरून माजी सैनिक याठिकाणी मानवंदना देणार आहेत. सुरक्षेच्या दृष्टीने देखील आयोजकांनी विशेष खबरदारी घेतली आहे.अशी माहिती कैलाश मोरे यांनी शनिवारी पत्रपरिषदेत दिली. अखिल भारतीय भिक्खु संघ शाखा अमरावती येथील भंतेगण या कार्यक्रमाला उपस्थित असणार आहेत. मानवंदना कार्यक्रमाला आनंदराज आंबेडकर यांचे सह विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळी या कार्यक्रमाला उपस्थित असणार आहेत. सुप्रसिध्द गायक प्रबोधनकार तुषार सूर्यवंशी, इजि. पवन दवंडे, अर्चना मोहिते, अशोक निकाळजे, कुणाल वराळे, अजय देहाडे, सुशिला गांगुर्डे, पुरूषोत्तम खांडेकर, योगेश पवार, अरविंद मोहिते (मुंबई) उपस्थित राहून बुध्द भिम गितांचा नॉनस्टॉप कार्यक्रम प्रस्तुत करण्यात येणार आहे. १ जानेवारीला ४.०० वाजता समता सैनिक दलचे रवि नागले, देवेंद्र खांडेकर यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये व माजी सैनिकांव्दारा सुभेदार अविनाश गायकवाड यांच्या नेतृत्वात सैनिक फेडरेशन च्या वतीने ५० बुलेट वरून खुल्या वाहनाव्दारे परेड व बिगुल च्या मध्यामातून मानवंदना देण्यात येणार आहे.मानवंदना कार्यक्रमाला येतांना अनुयायांनी पांढरे शुभ्रवस्त्र परिधान करून यावे अशी विनंती आयोजकांच्या वतीने करण्यात आली आहे दिनांक २ जानेवारी ला दुपारी ४.०० वाजता १००० बुध्द विहार समित्यांच्या सत्कार सोहळा तसेच मान्यवरांचा सुध्दा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे. त्या सोहळ्यात आनंदराज आंबेडकर उपस्थित राहणार आहेत. सायंकाळी अजय देहाडे, सुशिला गांगुर्डे, पुरुषोत्तम खांडेकर, योगेश पवार, अरिविद मोहिते, अर्चना मोहिते यांच्याव्दारे २८ नॉनस्टॉप भिमगितांचा कार्यक्रम होणार आहे. दिनांक ३ जानेवारीला सकाळी ९.०० वाजता सावित्रीबाई फुले जयंती साजरी करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजन करीता विविध समित्या स्थापन करून सर्वांकडे जबाबदारी सोपविण्यात आली आहे.उपस्थित अनुयायांची राहण्याची व जेवणाची सुद्धा व्यवस्था करण्यात आली आहे.

### सत्य परेशान हो सकता है, पराजीत नही; मतदारांचा विश्वास सहकार पॅनलवर

# अविनाश कोठाळे व राजेंद्र जाधव यांच्याकडून विजयाचा निर्धार

**दि.३०विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

जिजाऊ कमर्शिअल को ऑपरेटिव्ह बँकेने आजवर अत्यंत चांगला कारभार करून पारदर्शी सेवा सभासदांना प्रदान केली आहे. ऐन निवडणूकीच्या काळात कुठूनतरी एक अहवाल येतो आणि त्याच्या आधारे विरोधक आपली राजकीय पोळी शेकण्याच्या उद्देश्याने आमच्यावर खोटे आरोप करून आम्हाला नामोहरम करण्याचा प्रयत्न करतात. काल, आज आणि उद्याही जिजाऊ बँक प्रगतीवर होती आणि राहील. आम्ही बँकेच्या विकासाचा विचार करणारे लोक असून सत्य आमच्या बाजूने आहे. 'सत्य परेशान होऊ शकते परंतू पराजीत नाही' त्यामुळे बँकेचे सभासद योग्य उमेदवारांनाच मतदान करतील आणि सहकार पॅनल विजयाचा जल्लोष करेल असा निर्धार बँकेचे मुख्य प्रवर्तक अविनाश कोठाळे व राजेंद्र जाधव यांनी केला आहे.

सहकार पॅनल हे जिजाऊ बँकेच्या कल्याणाचा विचार करणारे पॅनल आहे. आजवर आम्हीच बँकेचा कारभार अगदी व्यवस्थित चालवला आहे. त्यात कधीही अडचण आली नाही. आजवर सर्वांना सोबत घेऊन अविरोध निवडणूका झाल्या आहेत. २२.७४ लक्ष भांडवलावर सुरू केलेली बँक आज ६३५ कोटींचा व्यवसाय करणारी बँक झाली आहे. बँकेला अनेक पुरस्कार देखील मिळाले आहेत. २०२१ मध्ये बँकेने स्वत:ची इमारत देखील उभी केली आहे. बँकेत आम्ही गैरव्यवहार केला नाही आणि यापुढे करणार देखील नाही. बँकेचा मोठा झालेला व्यवसाय हा अनेकांना आवडत नसावा किंवा त्यांच्यात बँकेची सत्ता हाती घेण्याची मनिषा निर्माण झाली असावी. यावेळी देखील संगनमताने तोडगा काढण्याचा प्रयत्न केला परंतू तो अयशस्वी झाला. निवडणूका या आम्हाला नकोच होत्या. त्या आमच्यावर लादण्यात आल्या आहेत. या निवडणूकांमुळे बँकेची मोठ्या प्रमाणावर बदनामी देखील झाली आहे. जिजाऊ बँकेने आजवर बँकिंग क्षेत्रात आपली एक अतुलनिय अशी इमेज निर्माण केली होती. त्या इमेजला आपल्याच काही लोकांनी धक्का लावला आहे.





कुठलेही सामाजिक क्षेत्र असो तिथे तुमच्यावर चार दोन माणस ही नाराज होणारच. अशाच काही लोकांनी बँकेच्या तक्रारी करून बँकेवर चौकशी आणली. या चौकशीत केवळ काही बाबींवर आक्षेप आहे. मात्र त्यामध्ये कुठेही बँकेत गैरव्यवहार झाला असे दिसून आलेले नाही. किंवा तसे सिद्ध देखील झालेले नाही. बँकेत असलेला एनपीए हा हळूहळू कमी होतो आहे. बँक काल आणि आजही नफ्यातच आहे. अशातच जाणून बुजून आमच्यावर काहीतरी लादण्याचा जो प्रयत्न होतोय तो आम्हाला मान्य नाही. सहकार पॅनल हे लोकांच्या विश्वासाचे पॅनल आहे. बँकेने ज्या तरूण उद्योजकांना कर्ज देऊन उभे केले आहे. त्यांचा विश्वास आमच्या पाठिशी आहे. विदर्भात अग्रगण्य अशी ही बँक असून यापुढे देखील ते नाव कायम असणार आहे. सहकार पॅनलचे सर्व उमेदवार सुशिक्षित आणि अभ्यासू असून मतदारांचा त्यांच्यावर विश्वास आहे असे अविनाश कोठाळे व राजेंद्र जाधव यांनी सांगितले आहे.

सहकार पॅनलच्या वतीने एकमेका साह्य करू अवघे धरू सुपंथ हा सहकाराचा धनंजय मंत्र स्वीकारून पॅनलच्या वतीने सर्वसाधारण मतदारसंघातून बबन आवारे, अविनाश कोठाळे, संजय कोल्हे, प्रदीप चौधरी, श्रीकांत टेकाडे, नितीन डहाके, सुरेंद्र दाळू, सुभाष देशमुख, अनिल बंड, गौरव विधळे, अनुसुचित जाती मतदारसंघातून स्वप्नील वावरे, महिला मतदारसंघातून पल्लवी बारब्दे, सुरेखा लुंगारे, इतर मागासवर्ग मतदारसंघातून विनोद कोरडे, भटक्या विमुक्त जाती मतदारसंघातून सुनील चाफले या सर्व उमेदवारांना मतदारांनी भरघोस मतांनी विजयी करावे असे आवाहन अविनाश कोठाळे व पॅनल प्रमुख इंजि.राजेंद्र जाधव यांनी केले आहे.

# बुलढाण्यात विदर्भवाद्यांचे आंदोलन दुर्लक्षित

### उपोषणकर्त्यांची चौथ्या दिवशी प्रकृती खालावली



**दि.३०विदर्भ प्रजासत्ताक बुलढाणा**

वेगळ्या विदर्भ राज्यासाठी विदर्भ राज्य आंदोलन समितीच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत उपोषण सुरू केले. गारठ्यात सुरू असलेल्या आंदोलनाच्या चौथ्या दिवशी उपोषणकर्त्यांची प्रकृती खालावली असून जिल्हाध्यक्षांना रक्तदाबाचा त्रास जाणवत आहे. दरम्यान या आंदोलनाकडे जिल्हा प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप होत आहे.

विदर्भ राज्य आंदोलन समिती युवा प्रदेशाध्यक्ष मुकेश मासुरकर, जिल्हाध्यक्ष सुरेश वानखेडे, राम बारोटे, तेजराव मुंडे, प्रकाश अवसरमोल, कैलास फाटे, जनार्दन इंगळे, रविकांत आढाव, राजेंद्र पवार हे २७ डिसेंबरपासून उपोषणाला बसले आहे. त्यांची नियमित आरोग्य तपासणी करण्यात येत आहे. आज चौथ्या दिवशी (दि. ३०) दुपारी उपोषणकर्त्यांची प्रकृती खालावली आहे. समितीचे जिल्हाध्यक्ष ॲड सुरेश वानखेडे यांना रक्तदाबाचा त्रास जाणवत असल्याचे आंदोलनस्थळी सांगण्यात आले. चौथा दिवस उलटल्यावरही प्रशासनातर्फे कोणत्याही अधिकाऱ्याने आंदोलकांची भेट घेतली नसल्याचे चित्र आहे. यामुळे विविध संघटना, राजकीय पक्षांनी भेटी देत पाठींबा दिला. मात्र अपवाद वगळता साठी गाठलेल्या आंदोलकांकडे प्रशासन दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप होत आहे.विदर्भ राज्याची निर्मिती, वीज दरवाढ मागे घ्यावी, कृषी पंपाना दिवसा वीजपुरवठा, जालना खामगाव रेल्वे मार्ग मंजूर करून राज्याने ५० टक्के निधी वाटा द्यावा, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत, अन्नधान्यावरील जीएसटी रद्द करावा या मागण्यांसाठी हे आंदोलन करण्यात येत आहे.

## आधीच अपघातांमुळे चर्चेत, आता चक्क लोखंडी सळीच उखडली! समृद्धीच्या बांधकामावरच सवाल

**दि.३०विदर्भ प्रजासत्ताक बुलढाणा**

आधीच अपघातांमुळे चारसत असलेल्या समृद्धी महामार्गावर एक भीषण प्रकार समोर आला आहे. ऐक महामार्गाच्या मधोमध चक्क लोखंडी सळीच उखडली गेली आहे. याचे काही व्हिडिओही समोर आले आहेत, जे पाहून अनेक नागरिक आपला रोष व्यक्त करत आहेत.

यातच समृद्धी महामार्गाला जेमतेम एक वर्ष बांधून पूर्ण झालं आहे. मात्र समृद्धी महामार्गावर कुठे खड्डे पडले आहेत तर, कुठे पुलावरून लोखंडी भाग तुटून वर आल्याचे दिसत आहे. गुरुवारी रात्री समृद्धी महामार्गावर सिंदखेड राजा जवळ चैन नंबर ३१९ येथे मुंबई कॉरिडॉरवर एका मोठ्या पुलावर पुलाचा लोखंडी भाग तुटून हा महामार्गावर आल्याने मोठा अपघात होण्याची शक्यता बळावली होती.मात्र एका वाहन चालकाने थांबून याचा व्हिडिओ बनवून तात्काळ जवळच्या टोल नाक्यावर याची माहिती दिली. त्यामुळे मात्र अनेक वाहनांचे मोठे अपघात टळले आहेत. समृद्धी महामार्गावर वेग मर्यादा ही १२० किलोमीटर प्रतितास असल्याने या महामार्गावरून धावणार्या गाड्यांचा वेग अतिशय जास्त असतो.यातच अशा लोखंडी भागाला जर वाहन धडकले तर मोठा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. मात्र आज एका वाहन चालकाच्या समय सुचकतेने हा प्रकार टळला आहे. तात्काळ समृद्धी महामर्गाच्या दुरुस्ती यंत्रणेने याची दुरुस्ती केली आहे. आता महामार्गावर वाहतूक सुरळीत जरी सुरु असली तरी याच्या बांधकामाबाबत नागरिकांकडून प्रश्न उपस्थित केले जात आहे.

# 'एक्साईज' विभागाची यवतमाळात धडाकेबाज कारवाई

### अवैधरीत्या हातभट्टी दारू विक्री करणाऱ्याला 'एमपीडीए'चा आदेश पारित करीत पोहचवले कारागृहात

**दि.३०विदर्भ प्रजासत्ताक यवतमाळ**

अवैधरीत्या हातभट्टी दारू गाळप करून विक्री करणाऱ्या कुख्यात आरोपीविरुद्ध 'एमपीडीए'चा आदेश पारीत होताच आरोपीला अकोला कारागृहात स्थानबद्ध करण्यात आले. राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या वतीने यवतमाळच्या इतिहासात या प्रकारची केलेली ही पहिलीच कारवाई असल्याचे सांगितले जाते.



अमर राजू दातार (३५, रा. राणी अमरावती, ता. बाभूळगाव), असे एमपीडीएअंतर्गत कारागृहात स्थानबद्ध करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. आरोपी अवैध हातभट्टी दारू गाळप करून विक्री करण्याचा व्यवसाय अनेक वर्षापासून करत आहे. यापूर्वी त्याचा हातभट्टी दारू अड्डा उद्ध्वस्त करून गुन्हेही नोंदविण्यात आले आहेत. तरीही तो हातभट्टी दारू गाळप करून विक्री करतच होता.हातभट्टी दारू विक्रीला आळा घालण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभाग कार्यालयाच्या वतीने जिल्हादंडाधिकारी यांच्याकडे एमपीडीएचा प्रस्ताव पाठविण्यात आला होता. जिल्हादंडाधिकारी डॉ. पकंज आशिया यांनी आदेश पारीत करताच अमर दातार याला अकोला कारागृहात स्थानबद्ध करण्यात आले. ही कारवाई राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक नीतेश शेंडे यांच्या मार्गदर्शनात भरारी पथकाने केली.

राज्य उत्पादन शुल्क विभागाने डिसेंबर महिन्यात अवैध दारूसंदर्भात ११५ गुन्हे दाखल केले व १२२ आरोपींविरुद्ध कारवाई केली. या कारवाईत ११ लाख १३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. कलम ९३ अंतर्गत सहा आरोपींविरुद्ध प्रतिबंधात्मक गुन्हे नोंदविण्यात आले. दोघांवर उल्लंघनाची कारवाई करण्यात आली आहे.

# पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुपमध्ये भव्य गजानन महाराज पालखी सोहळा संपन्न

### संस्थेचे उपाध्यक्ष श्रेयशदादा पोटे पाटील यांचा टाळ, मृदूंग व वारकऱ्यांसोबत सहभाग

**दि.३०विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप अमरावती येथे टेकलॉन्स या आंतरराष्ट्रीय महोत्सवाला नुकताच सुरवात झाली दररोज निरनिराळ्या प्रोग्रॅमचे आयोजन येथील विद्यार्थ्यांच्या विविध क्लब च्या वतीने करण्यात येते असून आज श्री संत गजानन महाराज पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप चे उपाध्यक्ष माननीय श्रेयशदादा पोटे पाटील यांच्या हस्ते महाविद्यालयात श्रींचे पूजन करण्यात आले व वारकरी ,भजन, टाळ, मृदूंग च्या निनादात श्रीच्या पालखी सोहळा सुरवात झाली संपूर्ण महाविद्यालय परिसरात या पालखी चे ठिकठिकाणी पूजन स्वागत करण्यात आले या पालखी सोहळ्यात पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप च्या अभियांत्रिकी, फार्मसी, आयुर्वेदिक, नर्सिंग, एमबीए, एमसीए, आर्किटेक्चर, कृषी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी



पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप चे उपाध्यक्ष माननीय श्रेयशदादा पोटे पाटील यांच्यासोबत भजन, टाळ, मृदूंगावर ताल धरत उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला महाविद्यालयातील संपूर्ण परिसर भक्तिमय झाले होते. या पालखी सोहळयाचे उत्कृष्ट नियोजन महाविद्यालय एनएसएस प्रमुख यांच्या देखरेख अंतर्गत सर्व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी केले.या पालखी सोहळ्याला पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप चे उपाध्यक्ष माननीय श्रेयशदादा पोटे पाटील, पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. टी. इंगोले, पी. आर. पोटे पाटील फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्या डॉ दीप्ती रुईकर, पी. आर. पोटे पाटील आयुर्वेदिक महाविद्यालयाचे डीन डॉ श्यामसुंदर भुतडा , पी. आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. नितेश चौधरी , पी. आर. पोटे पाटील आर्किटेक्चर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ संजय देशमुख, पी. आर. पोटे पाटील नर्सिंग महाविद्यालय प्राचार्य प्रा. सुज्ञान गवई, पी. आर. पोटे पाटील इंटरनॅशनल स्कुलचे प्राचार्य प्रा. सचिन दुर्गे , पी. आर. पोटे पाटील बीएड महाविद्यालय चे प्राचार्या डॉ. अनुप्रिता देशमुख, पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ मोहम्मद झुहेर सर्व डीन , विभागप्रमुख व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वंचित आघाडीने मानले शरद पवारांचे आभार

**दि.३० विदर्भ प्रजासत्ताक अकोला :**

एरवी टीका करणार्या वंचित बहुजन आघाडीने ज्येष्ठ नेते शरद पवार यांचे कौतुक केल्याने राजकीय वर्तुळात अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. वंचितला इंडिया आघाडीत समाविष्ट करण्यासाठी शरद पवारांनी काँग्रेस पक्षाकडे शब्द टाकून पाठपुरावा केला. त्यामुळे वंचितने त्यांचे आभार मानले. काँग्रेसकडून प्रतिसाद मिळत नसल्याची टीकादेखील वंचित आघाडीने केली.

ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी अमरावती येथे बोलताना, मल्लिकार्जुन खर्गे यांना वंचितच्या पत्राला उत्तर देण्याची आणि प्रकाश आंबेडकर यांना महाविकास आघाडीसह इंडियाचे निमंत्रण देण्याची विनंती दिल्लीमध्ये केल्याचे सांगितले. वंचित आघाडीचे मुख्य प्रवक्ते सिद्धार्थ मोकळे यांनी शरद पवार यांच्या भूमिकेचे जाहीर स्वागत करून आभार मानले. १९ डिसेंबर रोजी झालेल्या चौथ्या इंडिया आघाडीच्या बैठकीत शरद पवार यांनी घेतलेल्या पुढाकाराचे कौतुक करतो, असे ते म्हणाले.अद्याप भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या दिल्लीतील मुख्यालय किंवा मल्लिकार्जुन खर्गे यांच्या कार्यालयाकडून कोणतेही पत्र किंवा कोणत्याही प्रकारचा संवाद झालेला नाही. आम्ही आघाडी करण्यासाठी सकारात्मक आहोत. इंडिया व मविआ आघाडीत आमंत्रित करण्यासाठी काँग्रेसकडून प्रतिसादाची वाट पाहत आहोत, असे सिद्धार्थ मोकळे यांनी सांगितले.

